cmyk

## संपादकीय

### लोकशाही संपवण्याचाच डाव !

लोकशाहीत विरोधकाला अनन्यसाधारण महत्त्व असले तरी विरोधक पूर्णत: गाडला गेला पाहिजे अशीच भारतीय जनता पक्षाची रणनीती दिसते. भाजप नेत्यांनी वारंवार अशा प्रकारची वक्तव्ये करून आपल्या पक्षाच्या रणनीतीला, संकल्पनेला पाठबळ दिले आहे. निवडणूक कोणतीही असो, विरोधकांना पार नेस्तनाबूत करून टाकायचे हेच भाजपचे उद्दिष्ट असते. घराणेशाही संपवून टाकण्याचा ध्यास घेणारी भाजप एकाधिकारशाहीचे लांगुलचालन करताना दिसते. प्रदेश भाजपच्या 'महाविजयी अधिवेशना'ची सांगता रविवारी शिर्डी येथे झाली.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२६४ | बुधवार, दि.१५ जानेवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये



D.S.Nagargoje 8908165555 9175606738
A.S.Nagargoje 9284872700 8007003550
बालाजी बॅटरी हाऊस
सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस
आमच्याकडे सर्व प्रकारच्या बॅटरी योग्य दरात मिळतील.
पत्ता : काकु-नाना हॉस्पिटल समोर, जालना रोड, बीड.


# शेतकरी धास्तावला : एकिकडे भाव नाही दुसरीकडे खतांची दरवाढ

## नव्या वर्षात शेतकऱ्यांना बसणार मोठा भुर्दंड

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील शेतकऱ्यांना हवामान बदलासह शेतमालाला बाजारभाव मिळत नसल्याने आर्थिक फटका बसत असताना आता रासायनिक खतांच्या किमती वाढल्यानं शेतकरी धास्तावले आहेत. आधीच दर जास्त असताना खत उत्पादक कंपन्यांनी १ जानेवारी २०२५ पासून दरवाढ जाहीर केली आहे. त्यानुसार रासायनिक खतांच्या किमतीमध्ये ५० रुपयांपासून ते ३०० ते ३५० रुपयांची वाढ होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागणार आहे.



शेतकऱ्यांना आधीच त्यांच्या उत्पादनांना योग्य बाजारभाव मिळत नसल्याने आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. आधीच शेतमालाला भाव नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. वाढलेल्या महागाईने त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना आता नव्या वर्षात वाढणाऱ्या खतांच्या किमतीला सामोरे जावे लागणार आहे. हवामान बदलामुळे शेतकऱ्यांना अगोदरच आर्थिक समस्यांना ◀◀ पान २ वर



## बीडमध्ये मध्य प्रदेशातील मजुरांना डांबून ठेवले

भोपाळ । वृत्तसंस्था

दिवसाला ५०० रुपये मजुरी देऊ, असे सांगत त्यांना ऊसतोड करण्यासाठी आणण्यात आले. महिनाभर ऊस तोडून घेतला. मजुरांनी पैसे मागितले आणि घरी जाण्याचा विषय काढताच त्यांना डांबण्यात आले. एका गावात त्यांना २४ तास ओलीस ठेवण्यात आले. इतकेच नाही, तर मजुरांच्या कुटुंबीयांकडून पैसे उकळले. सुटका झाल्यानंतर मध्य प्रदेशात ◀◀ पान २ वर

# वाल्मिक कराडवर मोक्का लागताच परळीत आंदोलन पेटले

## कराड समर्थकाने स्वत:ला पेटवले; बसवर दगडफेक, हायवेवर जाळपोळ, पोलिस ठाण्यासमोर ठिय्या











बीड । प्रतिनिधी

वाल्मिक कराडवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे, तिकडे परळीतही आंदोलन पेटले. आंदोलन करताना एका तरुणाने स्वत:ला पेटवून घेत आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. तर बऱ्याच समर्थकांनी अंगावर ज्वलनशिल पदार्थ ओतून घेत आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. यासह एका बसवर दगडफेक करण्यात आली. तसेच बरेच समर्थकांनी राणी लक्ष्मीबाई टॉवरवर चढून आंदोलन केले. तसेच कराड यांची आई पारुबाई, पत्नी मंझिरी आणि सुनेसह इतर महिलांनी पोलिस ठाण्यासमोर ठिय्या मांडला. तसेच बीड–परळी हायववेर बऱ्याच ठिकाणी टायर जाळून आपला रोष व्यक्त केला. जोपर्यंत आपल्या मुलावरील मोक्का मागे घेतला जात नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नसल्याची भुमिका पारुबाई कराड यांनी घेतली आहे.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात यापूर्वी आठ आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली होती. मात्र वाल्मिक कराडवर मकोका लावण्यात आला नव्हता. वाल्मिक कराड याच्यावर देखील मकोका लावण्यात यावा अशी मागणी देशमुख यांच्या कुटुंबासह आ. सुरेश धस, आ. संदिप क्षीरसागर, खा. बजरंग सोनवणे, मनोज जरांगे यांच्याकडून करण्यात आली होती. अखेर मंगळवारी वाल्मिक कराडवर देखील मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. एसआयटीने त्यांचा ताबा घेतला असून खूनाच्या गुन्ह्यात त्यांची चौकशी होणार आहे. दुसरीकडे वाल्मिक कराडवर मकोका लावण्यात आल्यानंतर परळीमधील वातावरण चांगलेच तापले आहे.

परळी शहरातील राणी लक्ष्मीबाई टॉवरवर चढत कराड समर्थकांनी आंदोलन केले. यावेळी सुरेश धस, जितेंद्र आव्हाड, मनोज जरांगे, संदिप क्षीरसागर, बजरंग सोनवणे यांच्या विरोधात घोषणाबाजी करीत फोटोला जोडेमोरो आंदोलन केले. यावेळी एका आंदोलकाला भोवळ देखील आल्याची घटना घडली. वाल्मिक कराडच्या आईने देखील परळीमध्ये पोलिस ठाण्याच्या समोर ठिय्या आंदोलन केले. मात्र या आंदोलनादरम्यान त्यांची प्रकृती खालावली आहे. ◀◀ पान २ वर

### वाल्मिक कराडचा एसआयटीकडे ताबा

दरम्यान मोक्का लागताच वाल्मिक कराडचा एसआयटीने ताबा घेतला असून संतोष देशमुख यांच्या गुन्ह्यात चौकशी करण्यात येणार आहे. त्यास बुधवारी न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. कोर्ट काय निर्णय देणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### आज केज न्यायालयात हजर केले जाणार

संतोष देशमुख खून प्रकरणात वाल्मिक कराड यांचा आरोपी म्हणून समावेश केला आहे. त्यास केज न्यायालयात बुधवारी हजर करण्यात येणार आहे.

### धनंजय मुंडे अजित दादांच्या तर धस फडणवीसांच्या भेटीला



वाल्मीक कराड यांच्यावर मोक्का अंतर्गत कारवाई केल्यावर त्याचे परळीमध्ये तीव्र पडसाद उमटले. या पार्श्वभूमीवर धनंजय मुंडे यांनी अजित पवार यांची भेट घेतली. यावेळी दोघांमध्ये पंधरा मिनिट चर्चा झाल्यानंतर मुंडे हे परळी कडे रवाना झाले. तर दुसरीकडे भाजपचे आमदार सुरेश धस यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. दोघांमध्ये चर्चा झाली असली तरी कोणत्या मुद्द्यावर चर्चा झाली हे मात्र समजू शकले नाही.

### वाल्मिक कराडची प्रकृती खालावली

वाल्मिक कराडवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे, त्यानंतर त्याची वैद्यकीय चाचणी करण्यात आली, याचदरम्यान त्याची प्रकृती बिघडल्याची माहिती समोर आली आहे. वैद्यकीय चाचणीवेळीच त्याचा ईसीजी काढण्यात आला आहे.

### एसआयटीने नियमाप्रमाणे काम केले–आ. धस



संतोष देशमुख हत्या प्रकरणात जे कोणी आरोपी असतील त्यातील एकालाही सोडणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत. एसआयटीने जे काही काम केले आहे, त्यानुसार फर्दर डेव्हलपमेंट नुसार कोर्ट ऑर्डर देत आहे. त्यामुळे कुणी मागणी केली याचा विषय नाही. राज्य सरकारने नेमलेल्या एसआयटीने काम केले आहे. कायद्याच्या कचाट्यात जे सापडतील त्यांना शिक्षा करण्यात येणार आहे, असे आ. सुरेश धस म्हणाले आहे.

### काय म्हणाले अजित पवार



मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेणार का? या माध्यमांनी विचारलेल्या प्रश्नावर अजित पवार यांनी थेट उत्तर दिले. अजित पवार म्हणाले, जे कोणी दोषी असेल त्यांच्यावर कारवाई करा, असे मुख्यमंत्र्यांना सांगितले आहे. त्यानुसार मुख्यमंत्री कारवाई करत आहेत. सत्ताधारी असो की विरोधी असो किंवा इतर कोणाचा संबंध या प्रकरणात समोर आला तर कोणालाही थारा दिला जाणार नाही. सर्वांवर कारवाई होणार असल्याचे आम्ही सर्वांनी हे स्पष्टपणे सांगितले आहे, असे पवार म्हणाले.

### माझा लेक देवमाणूस, धस, क्षीरसागरांनी अडकवले–पारुबाई कराड

वाल्मिक कराड यांच्यावर मोक्का लावल्यानंतर परळीत त्यांची ७५ वर्षीय आई पारुबाई बाबुराव कराड यांनी ठिय्या आंदोलन करीत सुरेश धस आणि संदिप क्षीरसागर यांच्यावर हल्लाबोल केला. माझा लेक देवमाणूस आहे, सुरेश धस आणि संदिप क्षीरसागर हे त्याला अडकवत असल्याचे त्या म्हणाल्या. माझ्या लेकरावर झालेला अन्याय दूर करा त्याच्यावर दाखल झालेले सगळे गुन्हे खोटे आहेत असे त्या म्हणाल्या. तसेच कराड यांच्या आईची प्रकृती बिघडली होती, त्यांना बीपीचा त्रास होत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

### परळीला स्वतंत्र राष्ट्र घोषित करा–आव्हाड

वाल्मिक कराडवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे, यावर प्रतिक्रिया देताना ३०७ देखील दाखल करा अशी मागणी यावेळी जितेंद्र आव्हाड यांनी केली आहे. पुढे बोलताना त्यांनी मंत्री धनंजय मुंडेंना देखील टोला लगावला आहे. परळीला स्वतंत्र राष्ट्र घोषित करा आणि धनंजय मुंडेंना तेथील पंतप्रधान घोषित करा, अशी उपरोधात्मक टोला लगावला.

### सर्व आरोपींची नार्कोटेस्ट करा–जरांगे



त्याला मोक्यामध्ये घेतले आहे. त्याला कलम ३०२ मध्ये घेणे खूप गरजेचे आहे. ही इतकी भयंकर टोळी आहे की, एका जणाने खंडणी मागायची, बाकीच्यांना खून करायला पाठवायचे, काही जणांना गाडीत टाकायला पाठवायचे. ही सगळी लाभार्थी टोळी आहे, खुनातले आणि खंडणीतले एकच आरोपी आहेत. सर्व आरोपींची नार्कोटेस्ट करा, अशी प्रतिक्रिया मनोज जरांगे यांनी दिली आहे.

### खंडणी आणि खून प्रकरण एकच–दमानिया

वाल्मिक कराडला मकोका कोर्टासमोर सादर करण्यात येतंय यावरून आता तपासाची गाडी कुठेतरी रुळावर येईल. तपासाची दिशा योग्य दिशेला जाईल. खंडणी आणि संतोष देशमुख यांचा खून हे काही वेगळे नाही. ही दोन्ही प्रकरण वेगळी नाहीत मकोका लागल्याने या सर्व गोष्टी स्पष्ट होतील, असे अंजली दमानिया म्हणाल्या.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१३ जानेवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १०.०० क्विंटल | २,६३१ | २,७०० | २,६६५ |
| ज्वारी/हायब्रिड :२०.५० क्विंटल | १,५०० | २,२६६ | १,९८९ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : २७३.०० क्विंटल | ६,००० | ७,२०० | ७,०२० |
| उडीद : २.५० क्विंटल | ६,५०१ | ६,५७५ | ६,५३८ |
| बाजरी: २४.५० क्विंटल | २,५०० | ३,३५३ | २,८७९ |
| मुग : ०.५० क्विंटल | ६,८०१ | ६,८०१ | ६,८०१ |
| सोयाबीन: १९०.०० क्विंटल | ४,०२५ | ४,२०० | ४,१४० |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |

## एसटी कर्मचाऱ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात २५ खाटांचे रुग्णालय

### परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची मोठी घोषणा



मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात २५ खाटांचे तर मुंबईतील बोरिवली येथील जागेवर १०० खाटांचे रूग्णालय सुरू करण्यात येणार आहे. या रूग्णालयात एसटी कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांसाठी महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून उपचार करण्यात येतील, तसेच पाच लाखांपर्यंतच्या शस्त्रक्रियांचा ◀◀ पान २ वर

## संभाजीनगरमधून कुंभमेळ्यासाठी विशेष रेल्वे

छ. संभाजीनर । प्रतिनिधी

१९ फेब्रुवारी रोजी छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानकावरून कुंभमेळा विशेष रेल्वे निघणार आहे. कुंभमेळ्यात सहभागी होणाऱ्यांसाठी दक्षिण मध्य रेल्वेकडून १९ फेब्रुवारी रोजी विशेष रेल्वे सोडण्यात येणार आहे. छत्रपती संभाजीनगर–पाटणा ही विशेष रेल्वे १९, २५ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ७ वाजता सुटेल.

जालना, सेलू, परभणी, पूर्णा, वसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, मलकापूर, खंडवा, इटारसी, पिपरिया, नरसिंहपूर, प्रयागराज छिवकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बक्सर, आरा, दानापूरमार्गे पाटणा येथे तिसऱ्या दिवशी सकाळी ◀◀ पान २ वर

# राज्यातील शासकीय शाळांमध्ये आता सीबीएसई पॅटर्न

## शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिली धोरणाची माहिती

मुंबई । प्रतिनिधी

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मंत्रालयातील सर्वच विभागांसाठी पुढील १०० दिवसांच्या कामकाजाचा आढावा घेतला जात आहे. त्यानुसार शालेय शिक्षणामध्ये महाराष्ट्र पुन्हा आघाडीवर येणार असा विश्वास शालेय शिक्षण विभागाच्या बैठकीत त्यांनी व्यक्त केला. शिक्षण विभागाने गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी पाऊले उचलावीत असे निर्देश यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले. राज्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या वतीने १०० दिवसांच्या आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले.

या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत, त्यानुसार राज्यातील शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्नचा अंगीकार करून त्यात राज्याप्रमाणे आवश्यक बदल करण्यासंदर्भातही मुख्यमंत्री फडणवीस ◀◀ पान २ वर



### सर्व शाळेत मराठी भाषा शिकवणे अनिवार्य

राज्यातील सर्व शाळांमध्ये यापुढे राष्ट्रगीतापाठोपाठ राज्यगीत होणे अनिवार्य असल्याचे मतही शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी व्यक्त केले. राज्यातील अनेक शाळांमध्ये त्याची अंमलबजावणी होताना दिसत नाही. यापुढे राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये राष्ट्रगीता पाठोपाठ राज्यगीत लावणे सक्तीचे असल्याचे भुसे म्हणाले. मराठी भाषा प्रत्येक शाळात शिकवणं सक्तीचे असल्याचेही भुसे यांनी म्हटले.

cmyk

## अग्रलेख

# लोकशाही संपवण्याचाच डाव !

लोकशाहीत विरोधकाला अनन्यसाधारण महत्त्व असले तरी विरोधक पूर्णत: गाडला गेला पाहिजे अशीच भारतीय जनता पक्षाची रणनीती दिसते. भाजप नेत्यांनी वारंवार अशा प्रकारची वक्तव्ये करून आपल्या पक्षाच्या रणनीतीला, संकल्पनेला पाठबळ दिले आहे. निवडणूक कोणतीही असो, विरोधकांना पार नेस्तनाबूत करून टाकायचे हेच भाजपचे उद्दिष्ट असते. घराणेशाही संपवून टाकण्याचा ध्यास घेणारी भाजप एकाधिकारशाहीचे लांगुलचालन करताना दिसते. प्रदेश भाजपच्या 'महाविजयी अधिवेशना'ची सांगता रविवारी शिर्डी येथे झाली. समारोपप्रसंगी बोलताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले, ग्रामपंचायती, नगरपालिका, जिल्हा परिषदा व महापालिकांपासून संसदेपर्यंत भाजपच्या विजयाचा झेंडा फडकत राहिला पाहिजे. महाराष्ट्रात भाजपची इतकी अजेय व बलशाली उभारणी करावी की, पुन्हा कोणाचीही दगाबाजी करण्याची हिंमत होणार नाही.

शिर्डी येथे भाजपच्या दोन दिवसीय राज्यस्तरीय अधिवेशनाला राज्यातील भाजपचे सर्व नेते, १५ हजार पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपचे हे अधिवेशन महत्त्वाचे मानले जात आहे. या अधिवेशनात व्यासपीठावर महापुरुषांच्या प्रतिमांसोबतच पहिल्यांदाच संविधानाची प्रत देखील ठेवण्यात आली होती. शिवसेना, राष्ट्रवादीची शकले पडल्यानंतर अन्य प्रादेशिक पक्षांचा घास घेण्याची तयारी भाजपने केली आहे. त्याचबरोबर विरोधी पक्षाला नेस्तनाबूत करण्याचे भाजपने ठरवले असल्याचे दिसत आहे. त्यातूनच लोकशाही संपवण्याचा डाव भाजपने आखला आहे. केंद्रात असो की राज्यात अथवा अगदी ग्रामपंचायतीतही सक्षम विरोधी पक्षनेता असणे हे सुदृढ लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे. सध्या महाराष्ट्रातील महाविकास आघाडीत बिघाडी सुरू आहे तर दिल्लीतही विरोधी पक्षात पडझड सुरू आहे. सत्ताधाऱ्यांच्या चुकीच्या धोरणावर सडकून टीका करून त्यांना बिनचूक काम करण्यास भाग पाडणे हे महत्त्वाचे काम करण्याची जबाबदारी विरोधी पक्षनेत्याची असते. पंतप्रधान अथवा मुख्यमंत्री हे सरकारचे प्रतिनिधी असतात तर विरोधी पक्षनेता हा थेट जनतेचा प्रतिनिधी असतो. सरकारवर अंकुश ठेवणे, राज्यातील, देशातील ज्वलंत प्रश्नावर आवाज उठवणे ही विरोधी पक्षनेत्याची जबाबदारी आहे. त्यासाठी लोकशाहीने विरोधी पक्षनेत्याला विविध संसदीय आयुधे बहाल केली आहेत. आता भाजपने शतप्रतिशत सरकार हे लक्ष्य ठेवले आहे. येत्या काही वर्षांत त्यांची वाटचाल त्या दिशेनेच असणार. म्हणजे पक्षाची ताकद वाढल्यावर त्यांना सहकारी पक्षांची गरज उरणार नाही.

सध्या सहकारी पक्ष सुपात बसून हसत असले तरी पुढील निवडणुकीत ते कुठे असतील ते सांगायची गरज नाही. विरोधी पक्षाला संपवायला निघालेले सहकारी पक्षाला कसे सोडतील? देशात प्रादेशिक पक्ष नावालाही शिल्लक ठेवायचा नाही ही भाजपची इच्छा आहे. प्रादेशिक पक्ष हा लोकशाहीसाठी धोका आहे आणि त्यांचे अस्तित्व फार काळ राहणार नाही असे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी म्हटले आहे. भाजप राज्याराज्यातील विरोधी पक्ष पूर्णपणे संपवण्याच्या प्रयत्नात आहे. सत्ताधाऱ्यांकडे पाशवी बहुमत असणे लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे. सध्या देशात विरोधी पक्षांची अवस्था वाईट आहे. सारेच सत्ताधारी झाले तर लोकशाही राहणारच नाही. म्हणून विरोधी पक्षांनी सुद्धा आपली भूमिका प्रामाणिकपणे पार पाडली पाहिजे. विरोधी पक्ष हा लोकशाहीचा आत्मा आहे. विरोधी पक्षच संपले तर लोकशाहीसुद्धा संपेल. भाजप शुद्धीवर असेल तर त्यांना लोकशाहीचे महत्त्व कळेल.

## शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबण्यासाठी विविध विभागांचा आढावा

जालना । प्रतिनिधी

आपला देश कृषी प्रधान देश म्हणून ओळखला जातो. शेतकरी आपला अन्नदाता आहे. तरी शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी योग्य त्या उपाययोजना कराव्यात, असे निर्देश कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांच्याकडून शेती विषयक विविध विभागांचा आढावा घेण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडीक, उपजिल्हाधिकारी मनीषा दांडगे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकार गहिनीनाथ कापसे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत गायरान जमिनीवरील चारा लागवड करणे. प्रधानमंत्री पीक विमा योजना कंपनीच्या प्रतिनिधीचे नाव व मोबाईल क्रमांक ग्रामपंचायत कार्यालयात प्रसिद्ध करणे, शेतीच्या बांधावर जैविक प्रयोगशाळेची उभारणी करणे. जिल्ह्यात प्रेरणा प्रकल्पाअंतर्गत शेतकऱ्यांना व आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियाना आरोग्य सुविधा पुरविणे. कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये शेतमालाचे किमान आधारभूत किंमत दर्शनी भागावर लावणे. कौशल्य विकास कार्यक्रमास ग्रामस्तरावर प्रसिद्धी देणे. महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाच्या अंतर्गत येणाऱ्या कंपन्यांच्या सीएसआर निधीतून शेतकऱ्यांसाठी विविध योजना व उपक्रम राबविणे. महाराष्ट्र कृषी औद्योगिक विकास महामंडळ अंतर्गत खते व इतर कृषी विषयक उत्पादन करणे. मुलांना शिक्षणाची सोय, स्पर्धा परीक्षा अभ्यासक्रम सोयी सुविधा उपलब्ध करून देणे. कृषी विभाग व इतर योजना, सावकारी प्रकरणे, खरीप हंगाम कर्ज वाटप, वन्य प्राण्यांपासून शेतकऱ्यांचे नुकसान व मोबदला, अन्न सुरक्षा व पुरवठा विभागाच्या शेतकऱ्यांसंबंधी योजना, आदिवासी विभागाच्या शेतकऱ्यासंबंधी योजना, जिल्ह्यातील तलाव व सिंचन क्षमता आणि रेशीम लागवड या विषयाचा आढावा घेत विविध सूचना दिल्या. तसेच जिल्ह्यातील तुती लागवडीबाबत रेशीम विकास अधिकारी अजय मोहिते व प्रशासनाचे कौतूक करत जालना जिल्ह्यातील तुती लागवडीबाबत समाधानी असल्याचे सांगितले.

# एकाग्रतेतून आनंदासाठी विज्ञानाची गरज-जेष्ठराज जोशी

## मराठी विज्ञान परिषदेच्या अंबाजोगाई शाखेचे उद्घाटन



अंबाजोगाई । प्रतिनिधी

एकाग्रतेतून आनंद निर्माण होण्यासाठी विज्ञानाची गरज असुन जीवन जगताना याच जिज्ञासेतून यशस्वी होता येते असे मत मुंबई येथील मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष तथा आय.सी.टी.चे कुलपती पद्मभूषण जेष्ठराज जोशी व्यक्त केले.

ते योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित पू. बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्रामार्फत मराठी विज्ञान परिषदेच्या अंबाजोगाई शाखा उद्घाटन प्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक डॉ.सुरेश खुरसाळे होते.प्रमुख पाहूणे म्हणून मराठी विज्ञान परिषदेचे सचिव श्री.अ.पां.देशपांडे तर मंचावर संभाजीनगर च्या मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष डॉ. रंजन गर्गे,मराठी विज्ञान परिषदेच्या सोलापूर शाखेचे अध्यक्ष डॉ.व्यंकटेश गंभीर, मराठी विज्ञान परिषदेचे व्यवस्थापकीय संचालक राजेश समेळ,योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, कार्यकारी उपाध्यक्ष ॲड.जगदीश चौसाळकर,सचिव कमलाकर चौसाळकर, सहसचिव प्रा. भीमाशंकर शेटे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना मा.जेष्ठराज जोशी म्हणाले की,विज्ञानाच्या माध्यमातून विविध शोध लागले त्यामुळे मानवी जीवन आनंददायी आहे पुढील काळातही वैज्ञानिकांच्या संशोधकातून विविध शोधांची निर्मिती होईल असे सांगून त्यांनी शास्त्रज्ञ मायकेल फॅरेडे यांचे संशोधन व सभोवतालची प्रतिकूल परिस्थिती याचा संदर्भ देऊन त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना विज्ञानाच्या विश्वात नेले. श्री.अ.पां.देशपांडे म्हणाले की, कोणत्याही गोष्टीसाठी सातत्याने प्रयत्न आवश्यक असतात मगच ती गोष्ट साध्य होते.संशोधन करण्यासाठी सुविधांची आवश्यकता नसते यश अपयश ह्या गोष्टी परिस्थितीपूरक नसतात त्या कष्टाने साध्य करता येतात असेही त्यांनी सांगितले. डॉ.रंजन गर्गे,डॉ.व्यंकटेश गंभीर यांनीही मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी शिक्षणा सोबतच वैज्ञानिक दृष्टीकोन जोपासून विज्ञान प्रयोग निरीक्षण, आवड निर्माण केली पाहीजे असे मत अध्यक्षीय समारोपात डॉ.सुरेश खुरसाळे यांनी व्यक्त केले. उपस्थित पाहुण्यांचे स्वागत पू.बाबासाहेब परांजपे विज्ञान केंद्रांच्या वतीने करण्यात आले. संस्थागीत,विज्ञान गीताने कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. या निमित्त्याने आयोजित केलेल्या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन व वृक्षारोपण मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी संस्थेतील विज्ञान विषयक उपक्रमांची माहिती दिली. संचालन प्रा.डॉ.संदीप काळे यांनी तर उपस्थितांचे आभार हेमंत धानोरकर यांनी मानले. या कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी, संचालक, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# शासकीय जमीनीवर बोगस पिक विमा उचलणारेवर तक्रार करून एक महिना होऊनही कारवाई नाही

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरातील शासन जमिन गट क्रमांक २५९,२६० वर बोगस पिक विमा भरून वर्षानुवर्ष पिकविमा ऊचलेला आहे अशी तक्रार शेतकरी आबासाहेब तुकाराम राठोड व करण उजगरे यांनी तालुका कृषी अधिकारी वडवणी यांना दि ६ डिसेंबर २०२४ दिलेली असुन एक महिना होऊन देखील कसल्याही प्रकारची चौकशी किंवा कारवाई करण्यात आलेली नाही असा आरोप तक्रारदार यांनी केला आहे.

संपूर्ण राज्यात बोगस पिक विमा भरून शासनाला करोडो रुपयांचा चुना लावण्याचे प्रकार उघडकीस येत असून त्यामुळे बोगस पिक विमा प्रकरण संपूर्ण राज्यात गाजत असताना याचे लोन आता वडवणी शहरासह , तालुक्यात ही पसरल्याचे दिसून येत असून वडवणी शहरातील शासकीय जमीन गट क्र २५९,२६० या जमिनी वर बोगस पिक विमा वर्षानुवर्ष भरणा करून पिक विम्याचे पैसे उचलून शासनाची फसवणूक केलेली आहे अशी तक्रार आबासाहेब राठोड व करण ऊजगरे यांनी दि ६ डिसेंबर २०२४ रोजी तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे केलेली आहे.जिल्हा कृषी आधिकारी,ऊपविभागीय कृषि अधिकारी,तालुका विमा प्रतिनिधि यांनाही माहितीस्तव सादर आहे.यामध्ये वडवणी तालुका कृषी आधिकारी यांनी याप्रकरणी पंचनामा करण्या संदर्भात आदेशही काढला आहे व आपल्या स्तरावरुन स्थळ पाहणी करुन अहवाल पाठवा मात्र कृषी विभागाचे मंडळ कृषी अधिकारी गोपल ढाकणे यांनी कामात हलगर्जीपणा करत याचा पंचनामाही केला नाही,आणी ऑफीसमध्येही भेटत नाही, तक्रारदार यांनी एक महिना भरापासुन चकरा मारल्या फोन अनेकदा ऊचलत नाहीत, त्यामुळे कामात हलगर्जीपणा केल्याच्या कारणावरुन वरिष्टांनी गोपाल ढाकणेवर कारवाई करावी अशी मागणी तक्रारदाराकडुन होत आहे.

## जि.प.लघु पाटबंधारे अधिकाऱ्याला कारवाईसाठी जाग कधी येणार

**जालना । प्रतिनिधी**

पाच महिन्यांपूर्वी जिल्हा परिषद जलसंधारण अधिकारी पाटबंधारे विभागाकडून चौकशी करण्यासाठी आश्वासन दिले होते परंतु तसं काही झालं नाही म्हणून आता अधिकाऱ्याला जाग करण्यासाठी रोखठोक इसारा देण्यात येत आहे. अंबड तालुक्यातील मौजे ताडहादगांव येथील संपादित क्षेत्रामध्ये अतिक्रमीत जागेवर कुपनलीका घेऊन सौरपंप बसविल्याबाबत तक्रार जिल्हा परिषद लघु पाटबंधारे जलसंधारण विभागाचे प्रभारी कार्यकारी अभियंता सर्जेराव शिंदे यांच्याकडे कुंडलिक विश्वनाथ हरिचंदे, यांनी रिस्तर तक्रार केली.



मौजे ताडहादगांव ता. अंबड येथील गट नं. ५३८ मा पील संपादित क्षेत्रातील अतिक्रमणे काढण्यासंबंधी मी अनेक तक्रार अर्ज दिलेले आहेत परंतु कार्यवाही होत नसल्याने लोकशाहीदिनी देखील तक्रार अर्ज दिलेले आहेत तसेच दिनांक १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२४ या काळात या विषयासंदर्भानें उपोषणही केलेले आहे उपोषण सोडण्यासाठी म्हणून मला दोन महिण्यात कारवाई करण्याचे लेखी अश्वासन दिले होते परंतु अश्वासनाची पुर्तता अद्याप पर्यन्त केलेली नाही तसेच वितेक बाब म्हणजे या संपादित क्षेत्रात तळ्याच्या पाळूच्या भिंतीला लागूनच १०- १५ फुट अंतरावर नवीन कुपनलीका खोदून व्यांवर सौरउर्जा पंप देखील बसविण्या आहे. शासन संपादित क्षेत्रात सौरउर्जापंप कसा देण्यात आला याचीही करण्यात यावी. आणि संपादित क्षेत्रातील अवैध कुपनलीका बंद करण्यात यावी कुपनलीका घेणा-यावर योग्यती कायदेशीर कडक कारवाई करावी. मी उपोषण केल्यानंतर मला असे अश्वासन देण्यात आले होते की, दोन महिण्यात अतिक्रमणे काढण्यात येतील परंतु अतिक्रमणे काढण्याची कुठलीही कारवाई अद्याप झालेली नाही परंतु संपादित क्षेत्रात आज त्या ठिकाणी नवीन पत्राचे रोड टाकण्यात आले आहे. आता या संदर्भात जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पंचाळ व जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कारवाई करण्यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना आदेशित करावे अशी ही मागणी तक्रारदाराकडून करण्यात येत आहे. संपादित क्षेत्रातील अतिक्रमण काढण्याची कारवाई त्वरीत करण्यात यावी व नव्याने पत्राचे शेड झालेले आहे ते शेड काढण्यात यावे असे निवेदन मार्फत करण्यात आले आहे सदरची कारवाई हा अर्ज दिल्यापासून १५ दिवसाचे आत करण्यात यावी नसता नाविलाजास्तव आपल्या कार्यालया समोर अमरण उपोषण करण्यात येईल काही बरोबर बरं वाईट झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर राहील.

# लबाड लांडगे ढोंग करतय: प्रशासन आणि नगरपालिका सोंग करतय

**बीड कचरा आणि घाणीच साम्राज्य आहे. शहरात घाण आहे का घाणीत शहर हेच कळेनासे झाले. नगरपालिकेच्या नावाने कितीही ओरडले तरीही काहीच फरक पडत नाहीये. वाटते की नगरपालिका आता बहिरी आणि झोपलेली आहे. बीड शहर स्वच्छ करण्याचे काम आता जनतेवर आलेली आहे. जनतेने वेळीच जागे होऊन हे शहर स्वच्छ करण्याचे काम केले पाहिजे.**

आता वेळ आली आहे. नगरपालिका झोपली कि काय? का झोपायचे नाटक करते हेच कळतं नाही. बीड शहरात घाणी मुळे एखादा रोग लागून माणसाला मारण्याचे काम हि नगरपालिका करते.माणसे मेल्यावरच या नगरपालिकेला आणि प्रशासनाला हायसे वाटेल कि काय अशीच परस्थिती उद्भवली आहे.सध्यातर काय नगरसेवक हि नाही, नगराध्यक्ष नाही सगळीकडे वा हि वा आणि प्रशासनाला तर इकडे लक्ष द्याचेच नाही. प्रशासन तर काय अन नगरपालिका काय झोपायचं सोंग घेऊन आहे.प्रशासन एवढे थंड का हेच कळतं नाही. प्रशासनाला फक्त गाडगेबाबा जयंती आल्यावर आणि शहरात एखादी मोठी हस्ती आल्यावर च स्वच्छता करायची माहितीये. गाडगेबाबा जयंती आल्यावर त्यांचे भाषण करायचे आणि फोटोला मोठं मोठे हार घालून पेपरला फोटो द्याचे माहिती आहे. फोटो तर इतके असतील की प्रत्यक्षात आता गाडगेबाबा प्रगट होणार आहेत असे वाटते. गाडगेबाबा फक्त बोलत न्हवते हातात खराटा घेऊन प्रत्यक्षात स्वच्छता करत असत. आपली मात्र फक्त बोलाची कढी अन बोलाचाच भात अशी अवस्था झाली आहे.आपली खराठा हातात घेण्याचीच तयारी नाही. गाडगेबाबा च्या फोटोतला खराटा पाहायचा अन मेल्यागत शांत राहायचं. या घाणी मुळे किती तरी लहान मुले, वयस्कर माणसे यांना रोगाची लागण होऊन गंभीर आजार होऊ शकतात. मुददाड मनाच्या या प्रशासनाला त्यांच्या घरातील माणसे मेल्या शिवाय झोपेतून जाग येणार नाही.बीड शहरातील जागोजागी कचरा आणि घाणीच साम्राज्य आहे. शहरात घाण आहे का घाणीत शहर हेच कळेनासे झाले. नगरपालिकेच्या नावाने कितीही ओरडले तरीही काहीच फरक पडत नाहीये. वाटते की नगरपालिका आता बहिरी आणि झोपलेली आहे. बीड शहर स्वच्छ करण्याचे काम आता जनतेवर आलेली आहे. जनतेने वेळीच जागे होऊन हे शहर स्वच्छ करण्याचे काम केले पाहिजे.

आता वेळ आली आह. म्हणूनच म्हणते आता जनतेने ठरवले पाहिजे की आपल्या कॉलनीत कचरा सफाई करून आपल्या कॉलनीत आपणच एक कचरा कुंडी ठेऊयात. नेहमीच प्रशासनाला नावे ठेऊन नाही जमणार आणि नावे ठेऊन पण प्रशासनाला काही फरक पडत नाही. त्या मुळे आपली कॉलनीत, गल्ली स्वच्छ ठेवण्याचे काम करूयात. आपण जनता हि देरे हरी बाजावरी अशी अवस्था आहे आपली. चला उठा, जागे व्हा आणि एकत्रित पणे येऊन गाडगेबाबा ची शिकवण



रुपाली देशपांडे
मो.८८८८९५५५३९

## पान १ वरून...

### बीडमध्ये मध्य प्रदेशातील

पोहोचलेल्या कामगारांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन ही व्यथा सांगितली. त्यानंतर हे सगळे प्रकरण समोर आले. गेल्या काही दिवसांपासून बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीची जोरात चर्चा सुरू आहे. यावरून वातावरण तापलेले असतानाच एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बीडमधील एका ऊसतोड मुकादमाने ऊसतोडीसाठी मध्य प्रदेशातील १६ मजुरांना आणले. दिवसाला ५०० रुपये मजुरी देण्यात येईल, असे या मजुरांना सांगण्यात आले होते. हे मजूर बीडमध्ये आले. त्यांच्याकडून महिनाभर ऊसतोड करून घेतली गेली. डांबून ठेवण्यात आलेले हे सर्व मजूर मध्य प्रदेशातील कटनी जिल्ह्यातील कुठला तालुक्यातील आहेत. या मजुरांनी सुटका झाल्यानंतर घर गाठले आणि त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन सगळा घटनाक्रम सांगितला. दरम्यान, जिल्हाधिकारी म्हणाले की, मजुरी करण्यासाठी या मजुरांना महाराष्ट्रात नेण्यात आले होते. बरेच दिवस त्यांनी काम केले, पण त्यांना पैसे देण्यात आलेच नाही. त्यांना घरी जाऊ देण्यासाठी पैसे घेण्यात आले. हे बेकायदेशीर आहे आणि तक्रारीच्या आधारे पोलीस अधीक्षक आणि कामगार अधिकाऱ्यांना कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत.

------------

### शेतकरी धास्तावला : एकिकड

सामोरे जावे लागत आहे. त्यातच आता वाढणाऱ्या रासायनिक खतामुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत आणखी भर पडणार आहे.

सोयाबीनचे दर वाढतील, या अपेक्षेने शेतकऱ्यांनी शेतमालाची विक्री थांबवली होती, मात्र उलट दर कमी झाले. खत उत्पादक कंपन्यांनी १ जानेवारी २०२५ पासून रासायनिक खतांच्या किमती वाढवल्या आहेत. वाढीव दरानुसार डीएपी डाय अमोनिया फॉस्फेट खताची किंमत प्रती बॅग १ हजार ३५० रुपयांवरून १ हजार ५९० रुपये झाली आहे. तर १०:२६:२६ आणि १२:३२:१६ या खतांच्या किमती १४७० रुपयांवरून १७२५ रुपये होणार आहेत.तर सुपर फॉस्फेट ४७० वरून ५२० रुपयांपर्यंत दर वाढणार आहेत. या नवीन वर्षात सुरुवातीलाच शेतकऱ्यांवर आर्थिक संकट आल्यामुळे शेतकरी धास्तावला आहे. खरीप हंगामात झालेले नुकसान कसे भरून काढावे, हा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत असताना कसेबसे रब्बी हंगामात पेरणी केली. त्यातच ढगाळ वातावरण असल्यामुळे रोगाचा प्रादुर्भाव वाढला. आता रासायनिक खतांच्या किमती वाढल्यानं शेतकऱ्यांचा पाय खोलात गेला आहे.

-------------

### वाल्मिक कराडवर मोक्का लागताच

वाल्मिक कराडवर मकोका अंतर्गत कारवाई झाल्याची बातमी समोर येताच परळीमध्ये समर्थकांकडून बंदची हाक देण्यात आली. परळीमध्ये सर्वत्र शूकशुकाट पाहायला मिळत आहे, सर्व दुकाने बंद झाल्यावर कराड समर्थक रस्त्यावर उतरले. परळीमध्ये जोरदार आंदोलन करण्यात आले. बीड-परळी हायवेवर ठिकठिकाणी टायर जाळण्यात आले. तसेच एका बसवही दगडफेक करण्यात आल्याने परळी आगाराच्या सर्व फेऱ्या रद्द करण्यात आल्या. पोलिस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन सुरु असताना काही तरुणांनी अंगावर ज्वलनशिल पदार्थ ओतून घेत आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. जोपर्यंत माझ्या मुलावरील मोक्का मागे घेतला जात नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचा इशारा कराड यांची आई पारुबाई कराड यांनी दिला आहे.

**सहभागी सर्वांवर कारवाई व्हावी-धनंजय देशमुख**

आमची शेवटपर्यंत एक मागणी आहे. आमच्या मागणीत कधीही बदल होणार नाहीत. या कट कारस्थानात जे माणसं आहेत त्या प्रत्येकाला फाशीची शिक्षा झाली पाहिजे, अशी भूमिका धनंजय देशमुख यांनी मांडली. त्यांच्याकडे पुरावे असतील. त्यामुळे त्यांनी दावा केला आहे. मला एसआयटीवर विश्वास आहे. सीआयडीने पहिल्या सुनावणी दरम्यान जो युक्तिवाद केला होता त्यामध्ये खंडणी ते खून प्रकरणात कनेक्शन आहे, असे होते. मग त्या संदर्भातले पुरावे त्यांच्याकडे असतील म्हणून त्यांनी ताबा देण्यासाठी विनंती केली असेल, असे धनंजय देशमुख म्हणाले.

-----------

### संभाजीनगरमधून कुंभमेळ्यासाठी

१०:३० वाजता ती पोहोचेल. परतीसाठी पाटणा ते छत्रपती संभाजीनगर विशेष रेल्वे पाटणा येथून २१ आणि २७ फेब्रुवारी रोजी दुपारी ३:३० वाजता सुटेल आणि या मार्गानेच संभाजीनगर येथे पोहचणार आहे.

---------

### एसटी कर्मचाऱ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात

खर्च राज्यशासन करेल, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली आहे. राज्यातील खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या पुरवठादारांना एकाच शासकीय नियमनात आणण्यासंदर्भात मंगळवारी मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी परिवहनचे अपर मुख्य सचिव, संजय सेठी, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांच्यासह प्रवासी वाहतुक पुरवठादार कंपनीचे प्रतिनिधी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. याच बैठकीत रूग्णालयाबाबतची घोषणा करण्यात आली. सध्या राज्यभरात विविध ठिकाणी बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा या तत्त्वावर एसटीच्या जागांचा विकास केला जात आहे. भविष्यात या रुग्णालयांमध्ये एसटी कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांना कॅशलेस वैद्यकीय सुविधा पुरवण्यात येतील जेणेकरून त्यांना इतर महाग खासगी रुग्णालयात जाऊन खर्च करावा लागणार नाही. पुणे, कोल्हापूर, पूसद, वाशिम येथे रूग्णालय उभारण्यासंदर्भातील सादरीकरण यावेळी करण्यात आले. दरम्यान, ओला, उबेर, रॅपिडो सारख्या खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या पुरवठादारांना एकाच नियमावलीअंतर्गत आणणार असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी सांगितले. तसेच प्रवासी सुरक्षा, कार पुलींग, लायसन्स, ट्रॅफिक समस्या यासंदर्भातील पारदर्शक तक्रार यंत्रणा तातडीने तयार करण्याचे निर्देशदेखील परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी दिले.

------------

### राज्यातील शासकीय शाळांमध्ये

यांनी सूचना दिल्या आहेत. शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी याबाबत माहिती दिली. राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीनंतर संवाद साधला. त्यावेळी, सीबीएसई पॅटर्नचा अंगीकार करून त्यात राज्याप्रमाणे आवश्यक बदल करणे, शाळांना गुणवत्तेनुसार रँकिंग देणे, एका केंद्रात किमान एका शाळेमध्ये दहावीपर्यंत शिक्षण व्यवस्था निर्माण करून त्या शाळा आदर्श तर त्यातील एक वर्ग स्मार्ट वर्ग करणार असल्याचे त्यांनी म्हटले. त्यामुळे, राज्यातील सरकारी व अनुदानित शाळांमध्ये सुधारणा करण्यावर पुढील १०० दिवसांत शासनाकडून जोर देण्यात येत असल्याचे दिसून येते. तसेच, केंद्रीय शिक्षण पद्धतीचा गरजेनुसार अवलंबही केला जाईल. चालू वर्षात पहिलीच्या वर्गात सीबीएसई पॅटर्नचा विचार आपण करत आहोत, पुढच्या टप्प्यात सीबीएससी पॅटर्नच्या ज्या चांगल्या बाबी आहेत, त्या आपण शाळांमध्ये घेऊ, असे दादा भुसे यांनी म्हटले. सन २०२६-२७ मध्ये सीबीएसई पॅटर्नचा वापर होईल, असेही शिक्षणमंत्र्यांनी म्हटले.

------------

**टी.सी.हरवला आहे**

प्रशांत धर्मराज उबाळे या नावाचा १० वी पासचा टी.सी नगर रोड ते बालेपीर मोटरसायकल प्रवासामध्ये हरवला आहे. कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधा.

**संपर्क::मो.९५२७५१४७९३**

## राष्ट्रसंत भगवान बाबा पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



**जालना | प्रतिनिधी**

बदनापुर तालुक्यातील कडेगाव एथे हभप रामेश्वर महाराज कोल्हे.हभप शंकर महाराज रत्नपारखे. युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस गणेश कोल्हे. अशोक दादा निंबाळकर.सुभाषराव खाडे.प्रमोद खाडे.चंद्रकांत खाडे.विष्णू खाडे.शिवाजी खाडे.गणेश खाडे.नारायण खाडे.पंढरीनाथ निंबाळकर. संतोष शेलार. गणेश शेलार. मंजूर पठाण. मनोहर निंबाळकर. आधी सहम महिला उपस्थित होत्या.


# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार, दि. १५ जानेवारी २०२५




# विद्यापीठ नामविस्ताराचा लढा ही जनतेने सुरू केलेली चळवळ होती -ज्येष्ठ पत्रकार अमर हबीब

**किल्ले धारूर | प्रतिनिधी**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये इतिहास विभाग, सांस्कृतिक विभाग, आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ३१ व्या विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्ताने मुक्त पत्रकार, शेतकरी पुत्र आंदोलनाचे उद्गाते अमर हबीब यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून करण्यात आली. त्यांनी व्याख्यानातून मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्ताराची चळवळ सुरू झाल्यापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार होईपर्यंतचा इतिहास सविस्तरपणे सांगितला. १९५८ यावर्षी स्थापना झालेल्या मराठवाडा विद्यापीठामध्ये सर्व जाती-धर्माची मुले शिक्षण घेऊ लागली. या विद्यापीठाला महापुरुषाचे नाव असावे असा विचार समोर आला होता. मात्र या महापुरुषांच्या नावाने विद्यापीठ असल्यामुळे ज्या गोरगरीब मुलांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मुळे शिक्षण मिळत आहे त्यांचे नाव द्यायला हवे अशी मागणी १९७८ पासून सुरू झाली. या मागणीने हळूहळू जोर धरला. यासाठी चळवळ सुरू



झाली. या चळवळीने सत्रा वर्ष कार्य केले. दंगली झाल्या, अनेकांचे जीव गेले, जोगेंद्र कवाडे यांनी नागपूर ते औरंगाबाद असा लॉग मार्च काढला. शेवटी १४ जानेवारी १९९४ रोजी शरद पवार यांच्या सरकारने मराठवाडा विद्यापीठाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असा नामविस्तार केला. यामुळे विद्यापीठ नामवस्ताराचा लढा ही जनतेने हाती घेतलेली चळवळ होती प्रतिपादन केले. देशासमोरील शेतकरी आणि स्त्रियांविषयीच्या विविध प्रश्नांना शब्दबद्ध करून उपस्थितांना जाणीव करून दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी मनोगतातून उपस्थितांना विद्यापीठ नामविस्ताराची चळवळ लोकाभिमुख असून या चळवळीच्या माध्यमातून मराठवाडा विद्यापीठाला मिळालेले बुद्धिवादी, विश्वरत्न, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव विद्यापीठाचा लौकिक वाढविणारे आहे. यामुळे सर्व अध्यापकांनी विद्यापीठाच्या नावाला साजेसे कार्य करून विद्यापीठाच्या नावलौकिकात भर घातली पाहिजे असे सांगितले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून डॉ. राहुल साळवे यांनी आयोजना मागील भूमिका सांगितली. प्रा. बाबू सावंत यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्त आहे विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी विचार मंचावर उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर, कार्यालय अधीक्षक श्री. केशव भोंडवे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विनायक कापावार कार्यक्रमाधिकारी डॉ. विजयकुमार कुंभारे, प्रा. बालासाहेब जोगदंड, डॉ. दत्ता जाधव यांबरोबरच महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, विद्यार्थी, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राहुल साळवे यांनी तर आभार प्रा. राम लोखंडे यांनी मानले.

## जय जवान माध्यमिक विद्यालयात जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त संविधान उपक्रमांतर्गत संविधान व्याख्यान

**वडवणी | प्रतिनिधी**

जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कवडगाव येथील विद्यालयात दि.१२ जानेवारी २०२५ रोजी राजमाता जिजाऊ साहेब व युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त युवकदिन म्हणून साजरा करण्यात आला.तसेच हर घर संविधान उपक्रमांतर्गत आपले भारतीय संविधान व संविधानातील कलम या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात प्रथम उपस्थित प्रमूख पाहुणे व्याख्याते सन्माननीय श्री. ॲड.सूनील जी डोंबाळे,विद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य श्री. सारोक्ते डि.जी सर,उपस्थित सर्व मान्यवर व्यक्ती यांच्या हस्ते जिजाऊ माँ साहेब , स्वामी विवेकानंद ,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व संविधान प्रस्तावना या सर्व महामानवाच्या पावन प्रतिमेचे पूजन करून हार, पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. त्याच बरोबर



आलेल्या सर्व मान्यवर व्यक्ती, प्रमूख पाहुणे व्याख्याते यांचा विद्यालयाच्या वतीने शाल,श्रीफळ,पुष्प व एक पुस्तक देवून सत्कार करुण स्वागत करण्यात आले. वर्ग दहावी वर्गातील विद्यार्थिनी यांनी आपल्या सुमधुर आवाजात स्वागत गीता ने स्वागत केले.विद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.गीते व शिवबा पाळणा सुंदर नृत्य वर्ग आठवी मधील विद्यार्थिनी आदिती आव्हाड,प्रतीक्षा नेहरकर,प्रतीक्षा अंडील,अंकिता पवार,दिपाली करे या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट नृत्य सादर केले.तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व्याख्याते सन्माननीय ॲड. सुनील जी डोंबाळे यांनी आपल्या व्याख्यानामधून उपस्थित सर्व मान्यवर व्यक्ती,विद्यालयातील सर्व विद्यार्थी,विद्यार्थ्यांनी यांना आपले भारतीय संविधान व कलमे या बाबत मार्गदर्शन करताना संविधानातील सर्व घटक व विवीध कलम यांची माहिती देत उत्तम असे मार्गदर्शन केले. त्याच बरोबर त्यांनी आपल्या मनोगतातून सर्व संविधानातील तत्वे, आपले हक्क,अधिकार,कर्तव्य,जबाबदारी, याचीही जाणीव करून देत विद्यार्थी दशेत काय करावे वाचनाची आवड निर्माण व्हावी व पुढील काळात उत्तम मार्ग अवलंबून शिक्षणाच्या प्रवाहात प्रगती करत आपल्या आई वडील,गावाचे नाव उज्वल करावे ,आपल्या मनी जिद्द चिकाटी, ध्येपूर्तीसाठी अभ्यासाची साधना करावी. अशा अनेविध बाबतीत आपल्या मनोगतातून अनमोल व बहुमूल्य वेळ देत मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सूत्र संचालन विद्यालयातील सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.चोपडे सर यांनी केले तर प्रास्ताविक यादव सर यांनी केले.तसेच कार्यक्रम अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक प्राचार्य श्री. सारोक्ते सर यांनी आपले अध्यक्षीय भाषण करत सर्व उपस्थित सर्व मान्यवर व्यक्ती प्रमूख पाहुणे व सर्व यांचे आभार व्यक्त करत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व त्यांच्या भाषणाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमासाठी गावातील प्रतिष्ठित नागरिक, ज्येष्ठ नागरिक शिक्षणप्रेमी पालक वृंद माजी विद्यार्थी नागरीक उपस्थित होते. तसेच विद्यालयातील घाडगे सर, टाळे सर, हांगे सर, येवले सर, मुंढे सर, तौर मॅडम, गोंदरे,पाखरे, काळे,ससाणे आदी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद व सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी सर्व उपस्थित होते.

## महात्मा ज्योतीबा फुले विद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

**माजलगाव | प्रतिनिधी**

**शहरातील महात्मा ज्योतीबा फुले माध्यमिक विद्यालय माजलगाव येथे एक तुकडी एक उपक्रम अंतर्गत ८वी अ च्या वतीने राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली.**




दिनांक १२ जानेवारी रोजी शाळेला सुट्टी असल्यामुळे दिनांक १३ जानेवारी रोजी शाळेतील ८ वी अ मधील विद्यार्थ्यांच्या वतीने हा जन्मोत्सव साजरा करण्यात आला असता सुत्रसंचलन कु. भाग्यश्री शेजूळने केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु. समिक्षा चव्हाण हिने केले , सय्यद सायमा अन्? सिद्धी बोबडे यांनी पूष्पगुच्छ तयार केले व सिद्धी बोबडे हिने जिजाऊंची वेशभुषा धारण केली होती. पूणम लांबुड , प्रतिक्षा गावडे , बालाजी गवळी , नैतिक कस्बे , शशिकांत एखंडे यांनी भित्तिपत्रिका तयार केल्या होत्या. अनन्या भाग्यवंत व अक्षरा कर्डीले यांनी जिजाऊ वंदना गायली तर चि. प्रसेनजित अमर साळवे याने स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर मनोगत व्यक्त केले व ८ वी अ मधील सर्व विद्यार्थांचे प्रतिनिधित्व केले. या जयंती निमित्त प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका धसकटे मॅडम , पर्यवेक्षक मोरेश्वर मसलेकर सर व किरण देशमुख सर यांच्यासह सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती प्रसंगी सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## महासांगवीच्या नामदेव सानप यांनी प्रेम आपुलकी जिव्हाळा जपला



**पाटोदा | प्रतिनिधी**

तालुक्यातील समाजसेवक,मुकादम, विद्यमान सरपंच पती,तथा उद्योजक नामदेव सानप यांनी ऊसतोड मजुरांच्या बाबतीत प्रेम आपुलकी जिव्हाळा जपला असुन महासांगवी शिवारात होत असलेल्या उसाच्या तोडीच्या रानात जाऊन मकरसंक्रांत चे औचित्य साधून सर्व ऊसतोड मजुरांच्या महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले.परिणामी ऊसतोडणी कामगारांच्या महिलांच्या चेहऱ्यावर हास्य व आनंद व्यक्त केला आहे.

नामदेव सानप हे पाटोदा तालुक्यातील एक प्रसिद्ध उद्योजक असुन समाजसेवेचे व्रत घेतलेले मुकादमही आहेत.त्यांनी महासांगवी व पाटोदा परिसरात अनेक सामाजिक कामे केली आहेत.उसतोडणी मजुरांच्या कोणत्याही अडचणीत ते सतत मदतीला धाऊन जातात.नामदेव सानप यांच्या पत्नी महासांगवी येथिल सरपंच आहेत.उसतोडणी मजुराला प्रत्येक सणाला मिठाई किंवा इतर वस्तु देऊन त्यांच्या चेहऱ्यावर हास्य पहातात.महासांगवी शिवारात सध्या ऊसतोड चालु असुन प्रत्येक थळात इतर जिल्ह्यांतील मजुर आले आहेत.

पान ६ वरून...

### अखिल भारतीय जायसवाल

(बडोदा ,गुजरात), जेष्ठ समाजसेवक भरतलाल बाबूलालजी जायसवाल (इंदोर, मध्यप्रदेश), जेष्ठ समाजसेवक ईश्वरचंदजी रामकांतजी साव (मुंबई, महाराष्ट्र) , बी मधूसुदनजी जायसवाल (हैदराबाद ,तेलंगाणा) , लक्ष्मी नारायण परमेश्वर जायसवाल (अकोला महाराष्ट्र) यांचा समावेश होता.

याप्रसंगी संयोजक तथा २०२५-२०२८ चे नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी पुरस्कार प्राप्त सर्व मान्यवांचे अभिनंदन करत त्यांनी केलेल्या समाजकार्याचा उहापोह केला. महासभेच्या वतीने पुरस्कारासाठी व्यक्ती निवडतांना देशातील सर्व भागातील समाज बांधवांना समावेशीत करण्याचा प्रयत्न केला गेला असल्याचे सांगितले. त्याचबरोबर महासभेच्या सर्वोच्च अशा पदासाठी माझ्यासारख्या एक सामान्य कार्यकर्त्यावर विश्वास टाकून माझी राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड केली त्याबद्दल मी सर्व समाजबांधव तथा सर्ववर्गीय महासभेच्या सदैव ऋणात राहण्याचा प्रयत्न करून यापुढे समाजास एकसंघ करून त्यास पुढे नेण्याचा प्रयत्न करेन अशी भावना राजकिशोर मोदी यांनी या कार्यक्रम प्रसंगी व्यक्त केली. प्रमुख पाहुणे देशाचे ऊर्जा राज्यमंत्री नामदार श्रीपाद नाईक यांनी देखील सर्व पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे अभिनंदन केले. संयोजकांनी पुरस्काराला साजेशा व्यक्तींचीच निवड करून त्या पुरस्काराची उंची वाढवल्याचे मत यावेळी नमूद केले. देशभरात बहुतांश ठिकाणी विखुरलेल्या समाजास या अधिवेशनप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी एकत्र आणल्याबद्दल त्याचे कौतुक केले. त्याचबरोबर मोदी हे त्याच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाच्या कार्य काळात समाजाच्या विविध प्रश्नांची उकल महासभेच्या वतीने करतील अशी अपेक्षा देखील नाईक यांनी व्यक्त केली. दिलेल्या पुरस्काराने त्या त्या व्यक्तीची सामाजिक जवाबदारी वाढल्या जाऊन पुन्हा त्यांना आपले सामाजिक कार्य जोमाने पुढे न्यावे लागणार असल्याने या समाजभूषण कार्यक्रम प्रसंगी नमूद केले. अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक जयसवाल यांनी निवड झालेल्या या सर्व मान्यवरांनी देशभरात केलेल्या सामाजिक , शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील योगदानाची दखल घेऊन त्यांना जायसवाल महासभेच्या वतीने समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल समाधान व्यक्त केले. या समाजभूषण पुरस्काराचा वितरण सोहळा रविवार दि १२ रोजी मोदी लर्निंग सेंटर येथे संपन्न झाला. या सोहळ्याला देशभरातून दोन हजारावर जयस्वाल समाज उपस्थित होता.

### रोड रॉबरी करणारे तिन

४८९/२०२४ भा.दं.वि. कलम ३७९,२०१,३४ प्रमाणे ) केज पो.स्टे. जि. विड येथे गुरनं २६/२०२१ भा.दं.वि. कलम ३७९,३४ प्रमाणे ) केज पो.स्टे. जि. बिड येथे गुरनं ५०४/२०२१ भा.दं. वि. कलम ४५७,३८०,३४ प्रमाणे ) केज पो.स्टे. जि. बिड येथे गुरनं ५५७/२०२१ भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे ) केज पो.स्टे. जि. बिड येथे गुरनं ५८७/२०२३ भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे गंभिर गुन्हे दाखल आहेत.

तिन्ही आरोपीतांकडु एकुन २,३५,०००/- रुपये किंमतिचे ०६ मोबाईल, ०२ मोटारसायकल व एक चाकु

असा मुद्देमाल गुन्ह्याचे तपासकामी जप्त करण्यात आला. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल यांनी या गुन्ह्या संदर्भात तात्काळ कारवाई करण्याचे आदेश पोलिसांना दिले होते या आदेशावरून पोलिसांनी कारवाई केली.

पान ६ वरून...

### श्रीगणेश जयंतीनिमित्त

राऊत, अनिकेत राऊत, नितीन जिरे, योगेश कातळे, रमेश देशमाने, चंद्रकांत देशमाने, उमाकांत देशमाने, संदीप देशमाने, प्रसाद देशमाने, बाळकृष्ण देशमाने, विमलनाथ कोंडेकर, वैजनाथ जाधव, गणेश जाधव, विष्णू जाधव, पप्पू सातभाई, गजानन भावठाणकर, विशाल कंठीकर आदींसह गणेश भक्तांची उपस्थिती होती.

### समाजात झालेले दुषित

आदर्श गाव वंजारवाडी चा एकात्मतेचा आणि सामाजिक सलोख्याचा आदर्श हा संपूर्ण समाजांनी घेतला पाहिजे असे प्रतिपादन ह.भ.प.प्रकाश महाराज साठे यांनी आवर्जून या वेळेस केले. या कार्यक्रमासाठी ह.भ.प.महामंडलेश्वर आचार्य अमृताश्रमस्वामी महाराज,मुरलीधर बप्पा ढाकणे, ह.भ.प भरत आण्णा पठाडे, सरपंच वैजनाथ नाना तांदळे,लक्ष्मण पवार साहेब, अमर सानप,पंचकमिटी,ग्रामस्थ, तरुण वर्ग आणि महिला मोठ्या प्रमाणावर उपस्थित होत्या.

### भव्य किर्तन महोत्सव

फाटे, एकनाथ महाराज करे, उत्तरेश्वर महाराज जाधव, अशोक महाराज सोळंके,आनंत महाराज शेंडगे दत्ता महाराज सोनवणे, संतोष महाराज सोळंके, सिद्धेश्वर गुरुजी सोळंके,माणीक महाराज सांगळे उपस्थित गायक वादक मंडळी होती. यावर्षी संत तुकाराम महाराज यांच्या वैकुंठ गमन त्रीशतकोत्तर अमृत महोत्सव वर्षपूर्ती सोहळ्या औचित्य साधून संत तुकाराम महाराज यांची सेवा करणारे संत सेवकांचा श्री गुरु पुंडलिक महाराज देहूकर यांची काल्याचे किर्तनाने सांगता झाली व नंतर संत सेवकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी जालना, बीड,लातुर तथा परीसराती महाराज मंडळी रामेश्वर महाराज धपाटे, भानुदास महाराज खरात, एकनाथ महाराज पठाडे, भगवानबाबा पात्रूडकर,रामचंद्र महाराज शिर्के यांचा सन्मान करण्यात आला त्यावेळी परीसरात महाराज मंडळी माऊली महाराज उमरेकर, माणीक महाराज गरड, विठ्ठल महाराज मंत्री, लक्ष्मण आण्णा फपाळ, माऊली महाराज जगताप, गोरख महाराज सवासे, अर्जुन महाराज ढेंबरे, दयानंद महाराज वैरट,चाटगव, देव दहिफळ,नाकलगाव, बाभळगाव,चिखली, भजन मंडळ उपस्थित होते.

### नदीप्रमाणे आपले जीवन

समारोप करताना उपमुख्याध्यापक शैलेश कंगळे म्हणाले की,भौगोलिक संक्रमण व वैचारिक संक्रमण असे दोन प्रमुख संक्रमण आहेत.संक्रमण म्हणजे बदल.या संक्रमण कालाच्या योगावर आपल्यातील प्रत्येकाने बदल करुन घ्यावा.तिळातील स्नेह म्हणजे प्रेम व गुळातील गोडवा स्वीकारुनच आजच्या दिनी महिला हळदी कुंकवाचा कार्यक्रम करतात.विचारा वाचुन न पविजे समाधान या संत उक्ती प्रमाणे. त्या आपल्या विचाराचे आदान-प्रदान करण्यासाठीच त्याघरोघरी फिरतात. आजपासूनच प्रयागराज येथे कुंभमेळा भारतीय उत्सव परंपरेतील महान उत्सव संपन्न होतआहे.या उत्सवातून आपण एकात्मिकतेचा संदेश घ्यायचा आहे.गंगा यमूना सरस्वती या पवित्र नद्यांच्या संगमात साधु जन,भक्तजन,स्नान करतात व स्वतःला प्रवाहित करतात. साधुजीवन हे प्रवाहितअसते.म्हणजे स्थिर नसते.तेआपल्या भारतीय संस्कृतीच्या प्रचारासाठी सदैव भटकंती करतअसतात.आपण सुद्धा त्यांच्या प्रमाणे प्रवाहित व्हावे.नदी जशी प्रवाहित असते त्याच प्रमाणे ती निर्मळ व परोपकारी असते.आपण सुद्धा नदी प्रमाणे आपले जीवन निर्मळ व पवित्र आणि प्रवाहित बनवावे.सर्व शिक्षक, शिक्षिका,विद्यार्थी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

### नागनाथ देवस्थान मानूर

जय, गुरु गिरी महाराज की जय'' असा जयघोष करत पाऊले खेळत अतिशय उत्साही व आनंदी वातावरणात संपन्न झाली. या मिरवणूकस हजारोंच्या संख्येने शिष्य सदभक्त व मानूर पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थ यांच्या उपस्थिती होती. यावेळी या शिवनाम सप्ताहस बार्शी परंडकर बृहन्मठाचे श्री ष ब्र १०८ सद्गुरू राचलिंग शिवाचार्य परंडकर महाराज यांनी मानूर येथील सप्ताहात मिळणारा आनंद म्हणजे स्वर्गामध्ये मिळणारा आनंद आहे म्हणून संबोधले, तर माढा येथून आलेले श्री ष ब्र १०८ सद्गुरू प्रभुदेव शिवाचार्य माढेकर महाराज यांनी आपल्या जीवनात गुरूस्थान किती महत्वाचे आहे हे स्पष्ट केले आणि मानवी जीवनात शिक्षणाप्रमाणे संस्काराला महत्त्व देणे गरजेचे आहे असे उपस्थितांना संबोधित केले. तसेच बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी श्री शिवकुमार स्वामी साहेब, दिव्य लोकप्रभाचे संपादक तथा मानूर गावचे भुमीपुत्र संतोषजी मानूरकर, दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी, मानूर येथील जेष्ठ नेते दशरथरावजी वनवे (दादा), रामदास बडे, आदीनाथ नागरगोजे, भारत पाखरे, बाळासाहेब शिरसाठ, कलंदर पठाण, जयशिंग शिरसाठ व अशा असंख्य लहानथोर मंडळींची उपस्थिती होती. त्याचबरोबर मठसंस्थानाचे हजारो शिष्य व सदभक्त या सोहळ्यास उपस्थित होते.या अखंड शिवनाम सप्ताहास ३६ स्वामींची महत्वपूर्ण उपस्थिती होती तसेच अन्नदात्यानी अन्नदान व सेवा करणाऱ्यांनी तन-मन-धनाने सेवा करत आपली सेवा गुरू माऊलीच्या चरणी समर्पित केली.

### ज्ञानगंगा व शिवालय

हस्ते प्रमाणपत्र व रोख रक्कम १)प्रथम कु.विद्या दत्ता डोंगरे-५०१रू.

२)द्वितीय -कु.गौरी गणेश गोंदरे- ३०१रू. व ३)तृतीय - चि.रोहिदास नारायण मुंडे-२०१रू. स्वरूपात पारितोषिक देण्यात आले.तसेच ज्या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घेतला होता त्यांना उत्तेजनार्थ प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.त्यानंतर प्रमुख पाहुणे व अध्यक्ष यांनी मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले. यामध्ये २०१९ साली स्पर्धा पार पडल्या त्यावेळेस गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी हातामध्ये कागद घेऊन भाषण केले होते परंतु त्यावेळेस आदरणीय डी.डी राऊत सरांनी खंत व्यक्त केली होती .की वकृत्व हे कागद घेऊन न करता मनाने व अभ्यासपूर्ण आसावे आसे ते म्हणाले होते तेव्हापासुन आजपर्येंत अनेक वकृत्विचे आनेक बक्षिसे या गुरुकुलच्या मुलानी मीळवली २०१९ पासुन आजपर्येंत बक्षिस व प्रमाणपत्राचे वाटप या राऊत डी.डी.यांच्या संकल्पनेतुन आजही चालु आहे.तद्नंतरच्या प्रत्येक वर्षी झालेल्या सर्वच स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी होत- (गुरुकुल/तालुकास्तरीय/जिल्हास्तरीय अशा विविध पातळीवर) -आपल्या तडाखेबाज वक्तृत्व शैलीने मान्यवरांची मने जिंकली आणि आलेल्या मान्यवरांनी ज्ञानगंगा व शिवालय गुरुकुल ला कौतुकाची थाप दिली व अशीच उत्तरोत्तर प्रगती होत राहो अशा शुभेच्छा दिल्या.


**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी**

जि.जालना प्रशासकीय इमारत, घनसावंगी

npghansawangiangmail.com ०२४८३-२७१७८७

जा.क्र.२०२४/नपघ जा.प्र/कावी ६१

दिनांक:-१४/०१/२०२५

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार १. संपत भागुजी पटेकर २. उत्तम धनाजी साळवे ३. सिध्दोधन नामदेव पटेकर रा. डाकेफळ ता. घनसावंगी जि. जालना यांनी नामे कासाबाई कुंडलिक लहामगे रा. दहेगाव खुर्व ता. अंबड जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त के ३९६३ दि. १२/१२/२०२४ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं ५१४१ दिनांक: ३०/१२/२०२४ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला कासाबाई कुंडलिक लहामगे रा. दहेगाव खुर्द ता. अंबड जि. जालना नावावर असलेला गट नं (-) मधील प्लॉट नं. सि.स.नं. ज्याचा मिळकत क्र १७१०/२२ मधील एकुण क्षेत्र २०२.४१ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व : सरकारी रस्ता

पश्चिम: कदम यांची जागा

दक्षिण :- बाबासाहेब तारगे यांची जागा

उत्तरेस :- सिध्दोधन नामदेव पटेकर यांची जागा

या वरील चतुः सिमा मधील २०२.४१ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा, नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही, असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत घनसांवगी**


## छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची गड किल्ल्यांवर पद भ्रमंती



**माजलगाव | प्रतिनिधी**

**येथील छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक सहलीमध्ये पन्हाळा किल्ला व प्रतापगड किल्ल्यांवर पदभ्रमंती केली. याशिवाय विद्यार्थ्यांनी भौगोलिक, शैक्षणिक , सागरी ठिकाणांचा आनंद देखील घेतला. सदरील सहलीचे आयोजन ९ ते १२ जानेवारी दरम्यान करण्यात आले होते.**

छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या वतीने दरवर्षी शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात येते. यावर्षी पंढरपूर, नृसिंहवाडी , कोल्हापूर येथील महालक्ष्मी देवी दर्शन, कनेरी मठ, शाहू पॅलेस, पन्हाळा किल्ला, नाणीज मठ, गणपतीपुळे , प्रतापगड किल्ला महाबळेश्वर या ठिकाणी सहलीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी प्रतापगड व पन्हाळा किल्ल्यांचा इतिहास स्थानिक गाईड कडून जाणून घेतला. याशिवाय गणपतीपुळे येथील समुद्र सफरीचा आनंद घेतला. या सहलीमध्ये डॉ. योगिता होके पाटील, बालासाहेब झोडगे आप्पासाहेब होके, अनंत शेजुळ, मुरलीधर भाळशंकर, माधव घोलप, सय्यद गयास,अनंत राठोड, दत्तात्रय इंगळे, पंकज कळसकर, ज्ञानेश्वर पवार, तुळशीराम साळवे, फरजाना पठाण, स्मिता डाके, शिल्पा शिनगारे, विशाल सुंदरदे, डिगांबर राऊत यांच्यासह ७० विद्यार्थी सहभागी झाले होते.

## साने गुरुजी माध्यमिक विद्यालयात जिजाऊ माँ.साहेब व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी

वडवणी | प्रतिनिधी

साने गुरुजी माध्यमिक माध्यमिक विद्यालय, परभणी (के)येथील विद्यालयात दि.१२ जानेवारी २०२५ रोजी राजमाता जिजाऊ साहेब व युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त युवकदिन म्हणून साजरा करण्यात आला कार्यक्रमाची सुरुवात प्रथम उपस्थित प्रमूख पाहुणे मुख्याध्यापक श्री.तांदळे आर.आर.सर,उपस्थित सर्व मान्यवर व्यक्ती यांच्या हस्ते जिजाऊ माँ साहेब , स्वामी विवेकानंद पूजन करून हार, पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. त्याच बरोबर आलेल्या सर्व मान्यवर व्यक्ती, प्रमूख पाहुणे व्याख्याते यांचा विद्यालयाच्या वतीने



शाल,श्रीफळ,पुष्प व एक पुस्तक देवून सत्कार करुण स्वागत करण्यात आले. वर्ग दहावी वर्गातील विद्यार्थिनी यांनी आपल्या सुमधुर आवाजात स्वागत गीता ने स्वागत केले.विद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.गीते व शिवबा पाळणा सुंदर नृत्य वर्ग आठवी मधील विद्यार्थिनींनी उत्कृष्ट नृत्य सादर केले.तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व्याख्याते सन्माननीय तांदळे सर यांनी आपल्या व्याख्यानामधून उपस्थित सर्व मान्यवर व्यक्ती,विद्यालयातील सर्व विद्यार्थी,विद्यार्थ्यांनी यांना आपल्या मनोगतातून वाचनाची आवड निर्माण व्हावी व पुढील काळात उत्तम मार्ग अवलंबून शिक्षणाच्या प्रवाहात प्रगती करत आपल्या आई वडील,गावाचे नाव उज्वल करावे ,आपल्या मनी जिद्द चिकाटी, ध्येपूर्तीसाठी अभ्यासाची साधना करावी. अशा अनेविध बाबतीत आपल्या मनोगतातून अनमोल व बहुमूल्य वेळ देत मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सूत्र संचालन विद्यालयातील सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीमती. बडे मॅडम यांनी केले तर प्रास्ताविक कुटे सर यांनी केले.तसेच कार्यक्रम अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. तांदळे आर .आर सर यांनी आपले अध्यक्षीय भाषण करत सर्व उपस्थित सर्व मान्यवर व्यक्ती प्रमूख पाहुणे यांचे आभार व्यक्त करत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व त्यांच्या भाषणाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमासाठी गावातील प्रतिष्ठित नागरिक, ज्येष्ठ नागरिक शिक्षणप्रेमी पालक वृंद माजी विद्यार्थी नागरीक उपस्थित होते. तसेच विद्यालयातील वडमारे मॅडम,उजगरे सर, जोगदंड सर, तारळकर सर, शिंदे सर आदी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद व सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी सर्व उपस्थित होते.

# उसाला फाटा देऊन २.५ एकरात फुलवला आल्याचा मळा!

## नगरचा शेतकरी मिळवतोय १५ लाखांचे उत्पन्न





आजकाल शेतकरी पारंपरिक पिकांना फाटा देत कमी क्षेत्रात वेगळे प्रयोग करताना दिसतात. काही जण ड्रॅगन फ्रुट लावतात तर अनेकांना फळ पिकांची भुरळ पडते. पण अहमदनगरच्या एका शेतकऱ्याने उसाच्या लागवडीसाठी प्रसिद्ध असलेल्या मातीत केवळ अडीच एकरावर आल्याचा मळा फुलवत लाखोंचं उत्पन्न मिळवले आहे. मागच्या वर्षीही या शेतकऱ्याने एकरभर क्षेत्रातून १०८ क्विंटल आल्याचे उत्पन्न काढत १० लाखांचं उत्पन्न मिळवलं होतं. आता आलं काढणीला आलं असून शेतकऱ्याला किमान १४ ते १५ लाख रुपये निश्चित नफा मिळेल अशी अपेक्षा आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यात असलेल्या सोनई या गावचे संग्राम येळवंडे यांनी पारंपारिक ऊस शेतीला फाटा देत सव्वादोन एकरामध्ये आल्याची लागवड केली व हा प्रयोग यशस्वी केलाय. कमीत कमी क्षेत्रात अधिकाधिक उत्पन्न मिळवत आल्यातून लाखोंची कमाई करणारा या शेतकऱ्याचं परिसरात कौतुक होत आहे.

दीडशे क्विंटल आल्याची अपेक्षा

आज त्यांचे हे अडीच एकरातील आले काढणीला आले असून एकरी १३० ते १५० क्विंटल उत्पादन मिळेल अशी अपेक्षा या शेतकऱ्याला आहे. सध्या बाजारात आल्याची आवक चांगली असल्यानं भाव घसरले आहेत. तरीही येत्या काळात आल्यातून एकरी १४ ते १५ लाखांचे उत्पन्न संग्राम येळवंडे यांना अपेक्षित आहे. मागच्या वर्षी एका एकरात आल्याची लागवड या शेतकऱ्याला फायद्याची ठरली शेतावरच नऊ हजार रुपये क्विंटल दर मिळाला होता .त्यातून दहा लाखाचे उत्पन्न त्यांना मिळाले होते. त्यामुळे यंदा पुन्हा एकदा क्षेत्र वाढवत अडीच एकरात आल्याची लागवड या शेतकऱ्याने केली.

कशी केली आल्याची शेती?

सेंद्रिय खतांचा वापर करून ठिबक सिंचनाच्या सहाय्याने एकरी ९ ते १० क्विंटल बियाणे यावर्षी या शेतकऱ्याने वापरले व आल्याची लागवड केली.यावर्षी लागवडी पूर्वी त्यांनी शेतामध्ये बेड तयार केले व बायोमी टेक्नॉलॉजीच्या कृषी रसायन साक्षरता प्रशिक्षणाचा वापर करत आल्याची लागवड केली. आल्या सोबतच ते कांदा, ऊस व फळबागांमध्ये आंबा या पिकांची देखील ते शेती करतात. संग्राम येळवंडे यांना त्यांचा पेशाने इंजिनियर असणारा भाऊ धनंजय येळवंडे यांची देखील मोलाची मदत होते. पारंपरिक शेतीला फाटा देत आल्यासारख्या पिकाचा यशस्वी प्रयोग करत या शेतकऱ्यांना अहमदनगर जिल्हा सह परिसरातील शेतकऱ्यांमध्ये नाव काढलय

# रासायनिक खतांच्या दरवाढीने बळीराजा धास्तावला

## नव्या वर्षात खतांच्या बॅगांसाठी किती पैसे द्यावे लागणार?



राज्यातील शेतकऱ्यांना हवामान बदलासह शेतमालाला बाजारभाव मिळत नसल्यानं आर्थिक फटका बसत असताना आता रासायनिक खतांच्या किमती वाढल्यानं शेतकरी धास्तावले आहेत. आधीच हे जास्त असताना खत उत्पादक कंपन्यांनी १ जानेवारी २०२५ पासून दरवाढ जाहीर केली आहे. त्यानुसार रासायनिक खतांच्या किमतीमध्ये ५० रुपयांपासून ते ३०० ते ३५० रुपयांची वाढ होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागणार आहे.

शेतकऱ्यांना आधीच त्यांच्या उत्पादनांना योग्य बाजारभाव मिळत नसल्याने आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. आधीच शेतमालाला भाव नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. वाढलेल्या महागाईने त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना आता नव्या वर्षात वाढणाऱ्या खतांच्या किमतीला सामोरे जावे लागणार आहे. हवामान बदलामुळे शेतकऱ्यांना अगोदरच आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यातच आता वाढणाऱ्या रासायनिक खतामुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत आणखी भर पडणार आहे.

खताच्या किमतीत झाली वाढ

सोयाबीनचे दर वाढतील, या अपेक्षेने शेतकऱ्यांनी शेतमालाची विक्री थांबवली होती, मात्र उलट दर कमी झाले. खत उत्पादक कंपन्यांनी १ जानेवारी २०२५ पासून रासायनिक खतांच्या किमती वाढवल्या आहेत. वाढीव दरानुसार डीएपी डाय अमोनिया फॉस्फेट खताची किंमत प्रती बॅग १ हजार ३५० रुपयांवरून १ हजार ५९० रुपये झाली आहे. तर १०:२६:२६ आणि १२:३२:१६ या खतांच्या किमती १४७० रुपयांवरून १७२५ रुपये होणार आहेत.तर सुपर फॉस्फेट ४७० वरून ५२० रुपयांपर्यंत दर वाढणार आहेत. या नवीन वर्षात सुरुवातीलाच शेतकऱ्यांवर आर्थिक संकट आल्यामुळे शेतकरी धास्तावला आहे. खरीप हंगामात झालेले नुकसान कसे भरून काढावे, हा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत असताना कसेबसे रब्बी हंगामात पेरणी केली. त्यातच ढगाळ वातावरण असल्यामुळे रोगाचा प्रादुर्भाव वाढला. आता रासायनिक खतांच्या किमती वाढल्यानं शेतकऱ्यांचा पाय खोलात गेला आहे.

# उन्हाळी तीळ लागवडीचे तंत्र




तीळ लागवड प्रामुख्याने खरीप, अर्ध रब्बी आणि उन्हाळी अशा तिन्ही हंगामांत केली जाते. तीळ लागवडीनंतर हवामानात अचानक बदल झाल्यास तिळाची प्रत खालावते. याउलट उन्हाळी हंगामातील तीळ लागवडीमध्ये अधिक उत्पादन मिळून प्रतही चांगली मिळते. पांढऱ्या शुभ्र रंग असलेल्या तिळाला बाजारभावही चांगला मिळतो. त्यामुळे शेतकऱ्यांचा उन्हाळी तीळ लागवडीकडे कल वाढलेला दिसत आहे. उन्हाळी हंगामातील तीळ लागवड अधिक फायदेशीर ठरते.

लागवडीची वेळ आणि कालावधी : उन्हाळी तीळ लागवडीसाठी १५ फेब्रुवारीपर्यंतचा काळ योग्य असतो. उगवणीसाठी किमान १५ अंश, कायिक वाढीसाठी २१ ते २६ अंश आणि फुलधारणेसाठी २६ ते ३२ अंश सेल्सिअस तापमानाची आवश्यकता असते. तापमान ४० अंश सेल्सिअसच्या वर गेल्यास फुलगळ होते. तसेच फुलधारणेच्या काळात जास्त पाऊस झाला तरीदेखील फुलगळ होते.

जमीन : मध्यम ते भारी, पाण्याची निचरा होणारी जमीन लागवडीस निवडावी. वालुकामय पोयट्याच्या जमिनीत पुरेसा ओलावा असल्यास पीक चांगले येते. पूर्वमशागत खोल नांगरट करून कुळवाच्या साह्याने जमीन भुसभुशीत करावी. किंवा रोटाव्हेटरच्या मदतीने जमीन तयार करावी. पेरणीपूर्वी जमिनीवर लाकडी फळी फिरवून जमीन दाबून सपाट करावी. म्हणजे उगवण चांगली होण्यास मदत होते.

तिळाचे सुधारित वाण व त्याचे गुणधर्म

जे.एल.टी ४०८-२ (फुले पुर्णा) : ही जात ८४ ते ९७ दिवसात पक्व होते. मूळ व खोड कुजव्या रोगास साधारण प्रतिकारक आहे. तेलाचे प्रमाण ४९ टक्के असून उत्पादन ७ ते ८ क्विंटल देते. ए.के.टी.-१०१ : ९० ते ९५ दिवसात पक्व होते. पर्णगुच्छ, मूळ व खोड कुजका रोगास सर्वसाधारण प्रतिकारक आहे. तेलाचे प्रमाण ४८ ते ४९ टक्के असून ७.५ ते ८ क्विंटल उत्पादन देते. बीजप्रक्रिया : प्रतिकिलो बियाण्यांस, थायरम ३ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम २.५ ग्रॅम किंवा ट्रायकोडर्मा ४ ग्रॅम याप्रमाणे चोळावे. त्यानंतर अॅझेटोबॅक्टर अधिक पीएसबी २५ ग्रॅम चोळावे. पेरणी : शक्यतो बैलचलित पाभरीने ३० बाय १५ सेंमी किंवा ४५ बाय १० सेंमी अंतरावर पेरणी करावी. पेरणीवेळी बियाणे २.५ सेंमीपेक्षा जास्त खोलीवर पडणार नाही, याची काळजी घ्यावी. बियाणे जास्त खोलीवर पडल्यास उगवणीवर परिणाम होतो. पेरणीसाठी हेक्टरी २.५ ते ३ किलो बियाणे पुरेसे आहे. विरळणी : पेरणीनंतर ८ ते १० दिवसांनी पहिली, तर १५ ते २० दिवसांनी दुसरी विरळणी करावी. हेक्टरी रोपांची संख्या २.२२ लाख इतकी ठेवल्यास फायदेशीर ठरते. खत व्यवस्थापन : शेवटच्या कुळवणी अगोदर चांगले कुजलेले शेणखत हेक्टरी ५ टन किंवा एरंडी पेंड १ टन याप्रमाणे जमिनीत मिसळावे. तीळ पिकास हेक्टरी ५० किलो नत्राची मात्रा द्यावी. पहिली अर्धी मात्रा २५ किलो नत्र पेरणीवेळी आणि उर्वरित मात्रा पेरणीनंतर २१ दिवसांनी द्यावी. नत्राची दुसरी मात्रा दिल्यानंतर पिकांस लगेच पाणी द्यावे. अधिक उत्पादनासाठी पीक फुलोऱ्यात आणि बोंडे वाढीच्या अवस्थेत असताना २ टक्के युरियाची फवारणी करावी.

आंतरमशागत : सुरुवातीच्या ३५ ते ४० दिवसांच्या कालावधीत तण नियंत्रण करणे गरजेचे आहे. त्यासाठी पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनी पहिली कोळपणी आणि निंदणी करावी. तर ३० ते ३५ दिवसांनी दुसरी कोळपणी आणि गरजेनुसार निंदणी करून पीक तणविरहित ठेवावे. पाणी व्यवस्थापन : उन्हाळी तीळ पिकास जमिनीच्या मगदुराप्रमाणे १२ ते १५ दिवसांच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. फुले येण्याच्या आणि बोंडे धरण्याच्या काळात पाण्याचा ताण पडू देऊ नये. पीक संरक्षण : पाने गुंडाळणारी अळी, पाने खाणारी अळी व गादमाशी, रसशोषक किडी, तुडतुडे, कोळी व पांढरी माशी किडीच्या बंदोबस्तासाठी, (फवारणी प्रतिलिटर पाण्यातून) ५ टक्के निंबोळी अर्क किंवा क्विनॉलफॉस (२५ ईसी) २ मिलि याप्रमाणे १५ दिवसांच्या अंतराने दोन वेळा फवारणी घ्यावी. उन्हाळी तीळ पिकात पर्णगुच्छ, मर, व खोड व मूळ कुजव्या रोगाच्या नियंत्रणासाठी पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करावी, रोगग्रस्त झाडे अथवा भाग गोळा करून नष्ट करावा.

## दिन विशेष

### जागतिक दिवस: राष्ट्रीय सैन्य दिवस

### महत्वाच्या घटना

१५५९ : राणी एलिझाबेथ (पहिली) हिचा इंग्लंडची राणी म्हणून वेस्टमिन्स्टर अॅबे येथे राज्याभिषेक झाला.
१७६१ : पानिपतचे तिसरे युद्ध संपले.
१८६१ : एलिशा जी. ओटिस या संशोधकाला सुरक्षित उद्वाहकाचे जगातील पहिले पेटंट मिळाले.
१८८९ : द पेंबरटन मेडिसिन कंपनी या कंपनीची अटलांटा, जॉर्जिया, यू. एस. ए. येथे स्थापना झाली. ही कंपनी सध्या द कोका कोला कंपनी म्हणून प्रसिद्ध आहे.
१९४९ : जनरल करिअप्पा यांनी ब्रिटिशांकडुन भारतीय सेनेची सूत्रे हाती घेतली.
१९७० : मुअम्मर गडाफी लीबीयाचे सर्वेसर्वा झाले.
१९७३ : जनरल गोपाळ गुरुनाथ बेवूर यांनी भारताचे ९ वे लष्करप्रमुख म्हणून सूत्रे हाती घेतली. हे लष्करप्रमुख होणारे पहिले महाराष्ट्रीयन आहेत.
१९९६ : भारतातील रेल्वेयुगाच्या प्रारंभापासून ब्रिटिश परंपरा व संस्कृतीचा डौल मिरवणाऱ्या बोरीबंदर (व्हिक्टोरिया टर्मिनस) या स्थानकाचे नाव बदलुन ते छत्रपती शिवाजी टर्मिनस असे करण्यात आले.
१९९९ : गायिका ज्योत्स्ना भोळे यांना राज्य सरकारच्या वतीने गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार प्रदान करण्यात आला.
२००१ : सर्वांना मोफत असलेला ज्ञानकोश 'विकीपिडिया' हा इंटरनेटवर प्रथमच उपलब्ध झाला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७७९ : रॉबर्ट ग्रँट मुंबई इलाख्याचे राज्यपाल, मुंबईतील ग्रँट मेडिकल कॉलेजचे एक संस्थापक, मुंबईतील ग्रँट रोड हा त्यांच्याच नावाने ओळखला जातो. (मृत्यू:१८३८)
१८५६ : भारताचे प्रसिध्द राजनीती मर्मज्ञ, सामाजिक कार्यकर्ते अश्विनी कुमार दत्त यांचा जन्म.
१९१८ : भारताचे प्रसिद्ध स्वातंत्र्य सैनिक यशवंत अग्रवाडेकर यांचा जन्म.
१९२० : डॉ. आर. सी. हिरेमठ कन्नड साहित्यिक, कर्नाटक विद्यापीठाचे कुलगुरू (मृत्यू: ३ नोव्हेंबर १९९८)
१९२१ : बाबासाहेब भोसले महाराष्ट्राचे ९ वे मुख्यमंत्री कार्यकाल: २१ जानेवारी १९८२ ते १ फेब्रुवारी १९८३ (मृत्यू: ६ आक्टोबर २००७)
१९२६ : कुस्तीगीर खाशाबा दादासाहेब जाधव १९५२ च्या हेलसिंकी ऑलिम्पिकमधे वैयक्तिक पदक मिळवणारे पहिले भारतीय, शिवछत्रपती पुरस्कार मरणोत्तर (मृत्यू: १४ ऑगस्ट १९८४)
१९२९ : मार्टिन ल्युथर किंग (ज्युनिअर) कृष्णवर्णीयांचे गांधी म्हणून ओळखले जाणारे अमेरिकेतील मानवी हक्क कार्यकर्ते आणि नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: ४ एप्रिल १९६८)
१९३१ : मराठीह कथाकार शरच्चंद्र वासुदेव चिरमुले यांचा जन्म.
१९३८ : भारतीय फुटबॉलर चुनी गोस्वामी यांचा जन्म.
१९४७ : पत्रकार नितीश नंदी यांचा जन्म.
१९५६ : बहुजन समाज पक्षाच्या नेत्या मायावती यांचा जन्म.
१९८२ : प्रसिद्ध अभिनेता नील नितीन मुकेश यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९७१ : दीनानाथ दलाल अत्यंत लोकप्रिय व प्रतिभावान चित्रकार (जन्म: ३० मे १९१६)
१९९४ : हरिलाल उपाध्याय गुजराथी लेखक, कवी व ज्योतिषी (जन्म: २२ जानेवारी १९१६)
१९९८ : गुलजारीलाल नंदा भारताचे दुसरे पंतप्रधान, स्वातंत्र्यसैनिक व गांधीवादी कार्यकर्ते (जन्म: ४ जुलै १८९८)
२००२ : विठाबाई भाऊ (मांग) नारायणगावकर राष्ट्रपतिपदक विजेत्या तमाशा कलावंत (जन्म: ? ? १९३५)
२००९ : दादासाहेब फाळके पुरस्कार जिंकणारे तपन सिन्हा यांचे निधन.
२०१२ : भारताच्या पहिल्या महिला फोटोग्राफर होमाई व्यारावाला यांचे निधन.
२०१३ : डॉ. शरदचंद्र गोखले समाजसेवक (जन्म: २९ सप्टेंबर १९२५)
२०१४ : नामदेव लक्ष्मण ढसाळ दलित साहित्यिक (जन्म: १५ फेब्रुवारी १९४९)

# उसामध्ये हे आंतरपीक देते चांगला फायदा



ऊस हे दीर्घ कालावधीचे पीक असल्याने. त्याचे पीक तयार होण्यासाठी सुमारे १० ते १२ महिने लागतात. अशा परिस्थितीत शेतकरी या मध्यंतरीच्या वेळेचा फायदा घेऊन या काळात उसाबरोबरच अशी अनेक पिके घेऊन जादा कमाई करू शकतात. त्यामुळे उसासह इतर पिकांच्या उत्पादनाचा लाभ शेतकऱ्यांना मिळतो. ऊस उत्पादक शेतकरी केवळ एकाच पिकावर अवलंबून असेल तर त्यातून त्यांना हवा तसा नफा मिळू शकत नाही. अशा परिस्थितीत त्यांना उत्पन्न वाढविण्याकडे लक्ष द्यावे लागेल. उसासोबत अशी अनेक पिके आहेत जी उसापूर्वी पक्व झाल्यावर तयार होतात. या पिकांमधून फायदेशीर पिके निवडून शेतकरी उसाचे पीक तयार होण्यापूर्वी या पिकाची विक्री करून नफा कमवू शकतो.

उसासोबत कोणती पिके घेता येतात?

ज्या शेतकऱ्यांनी फेब्रुवारी-मार्चमध्ये उसाची लागवड केली आहे ते उसासोबत मूग, उडीद, धणे, मेथीची लागवड करू शकतात. हे पीक लाव्रात लवकर विक्रीसाठी येते आणि याला बाजार देखील चांगला असतो त्यामुळे शेतकऱ्यांना याचा मोठ्या प्रमाणात फायदा होतो.

असे करा नियोजन : जर तुम्हाला उसासोबत मूग वाढवायचा असेल तर त्याचे गुणोत्तर १:१ आहे, म्हणजे उसाची एक ओळ आणि मूग दुसऱ्या ओळीत लावा. जर तुम्हाला उसासोबत उडीद पिकवायचे असेल तर १:१ हे प्रमाण ठेवा. तुम्हाला उसासोबत कोथिंबीरची लागवड करायची असेल, तर ऊस आणि कोथिंबीरचे गुणोत्तर १:३ ठेवा. त्याचप्रमाणे, जर तुम्हाला उसासोबत मेथीची लागवड करायची असेल, तर त्याचे प्रमाण १:३ ठेवा.

मुग आणि उडदाला मिळतो चांगला भाव : कडधान्य पिकांपैकी मूग आणि उडीद या पिकांना बाजारात मागणी जास्त असून त्याचे भावही चांगले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी उसासोबत मूग आणि उडदाची लागवड करणे अत्यंत फायदेशीर ठरू शकते. मध्य प्रदेशातील अनेक शेतकरी शेत रिकामे असताना मूग पिकवून अतिरिक्त कमाई करत आहेत. विशेष म्हणजे मध्यप्रदेशात राज्य सरकार स्वतः दरवर्षी किमान आधारभूत किमतीत शेतकऱ्यांकडून मूग खरेदी करते. अशा परिस्थितीत तेथील शेतकऱ्यांना मूग लागवडीतून अतिरिक्त उत्पन्न मिळत आहे.

उसासह मूग आणि उडीद लागवडीचा फायदा : उसासोबत मूग आणि उडीदाची लागवड केल्यास जमिनीची सुपीकता वाढते. त्याचबरोबर खतांवर होणारा खर्चही कमी होईल. तुम्ही कडधान्य पिकाला दिलेल्या खताचा फायदा ऊस पिकालाही मिळेल. त्याच वेळी, आपल्याला या पिकांच्या सिंचनासाठी अतिरिक्त व्यवस्था करावी लागणार नाही. तुमच्या उसाच्या पिकाबरोबरच या पिकांनाही आपोआप पाणी दिले जाईल. अशाप्रकारे ऊस पिकासह मूग आणि उडीद पिकाची लागवड करून कमी खर्चात जास्त नफा मिळवता येतो. दुसरीकडे, ऊस पिकाला मूग आणि उडीद लागवडीतून नायट्रोजन मिळते, जे त्याच्या चांगल्या उत्पादनासाठी फायदेशीर आहे.

# चक्रधर स्वामींनी मानवधर्मास सर्वोच्च प्राधान्य दिले-बागडे

## महाचिंतनीचा समारोप ;दहा हजार भाविकांनी घेतला महाप्रसाद

जालना। प्रतिनिधी

महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर स्वामी यांनी अज्ञान ,अंधश्रद्धेतून समाजाला मुक्त करण्याचा प्रयत्न करत वर्ण ,जाती, व्यवस्थेला आव्हान दिले. जात , पंथ ,भेदभाव न पाळता आपल्या वागण्याने दुसऱ्याला त्रास, वेदना होऊ नये, हा मानवतेचा धर्म शिकवला. सोबतच मानवधर्मास चक्रधर स्वामींनी सर्वोच्च प्राधान्य दिले, असे प्रतिपादन राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी महाचिंतनीच्या समारोपप्रसंगी केले. राजपूत वाडी परिसरातील ज्ञान संजीवनी कॅम्पस मध्ये तीन दिवसांपासून सुरू असलेल्या " महाचिंतनी " चा शनिवारी ( ता. ११) राज्यपाल बागडे यांच्या उपस्थितीत समारोप झाला. यावेळी स्वागताध्यक्ष आ. अर्जुनराव खोतकर, आ. बबनराव लोणीकर, आ.नारायण कुचे, आ.अनुराधा चव्हाण, महंत बाभुळगावकर शास्त्री, संजीवनी हॉस्पिटलचे डॉ.बळीराम बागल, डॉ. कोमल ठाकरे, ज्येष्ठ पत्रकार गुलाबराव पाटील, पंडितराव भुतेकर, रामेश्वर भांदरगे, सभापती राधाकृष्ण पठाडे , संदीप कपाटे, आचार्य कळमकर बाबा, म. दर्यापूरकर बाबा ,महंत यक्षदेव बाबा, वायंदेशकर बाबा, योगेश अक्कर, डॉ.श्याम बागल, प्रभाकर बागल, दामू नवपूते, शिवाजी बागल, डॉ. प्रशांत बांदल, यांची प्रमुख उपस्थिती होती.

राज्यपाल श्री. बागडे पुढे बोलतांना म्हणाले,



भक्ती, श्रद्धा असावी मात्र आजही आजारी पडल्यावर काही लोक देवाला नवस बोलतात, नारळ फोडतात. सगुन पाहणं कितपत योग्य आहे? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. रोजच्या आचार , विचार आणि व्यवहारात जात आणू नये. आपण सर्व एक आहोत, हा चक्रधर स्वामींनी दिलेला संदेश जोपासला पाहिजे असे त्यांनी नमूद केले. भारताने जगाला शून्य ,दशमान पद्धती सोबतच प्रचंड विद्या दिली. मात्र बाहेरून आलेल्यांनी इथल्या धार्मिक भावना नष्ट करण्याचा प्रयत्न केला. देव, धर्मग्रंथ जाळले. महिलांनीच संस्कृती जिवंत ठेवली असून शिकलेल्या पालकांनी बालकांची स्मरणशक्ती, बौद्धिक क्षमता वाढली पाहिजे, यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन राज्यपाल बागडे यांनी केले. महंत बाभुळगावकर शास्त्री यांनी दुष्टांचे भले व्हावे , त्यांचे कौतुक करण्याची सुरुवात महानुभाव आणि वारकरी संप्रदायाने केली. ठक हे सर्वकाळी असतात, आज सर्व लोक भयग्रस्त आहेत, एकमेकांवर विश्वास नाही. फसलेले, थकलेल्या लोकांची थकावट दूर व्हावी, मेलेली संवेदना जीवंत व्हावी, द्वेष नष्ट व्हावा, माणसामाणसात प्रेमभावना निर्माण व्हावी,असा काजळी काढण्याचा प्रयत्न महाचिंतनीद्वारे सुरू असून वारकरी - महानुभाव अशा सर्व पंथांच्या लोकांना एकत्र करून विश्वास निर्माण करायचा आहे असे नमूद करत सौजन्य सर्व संप्रदायांचा आत्मा आहे, असे बाभुळगावकर शास्त्री यांनी शेवटी सांगितले.

आ. बबनराव लोणीकर यांनी ज्वलंत हिंदुत्व, धर्म, पंथ एकत्र आणून देशभक्ती, राष्ट्रनिर्माणाचे काम महाचिंतनीच्या माध्यमातून होत असून आपल्या मतदारसंघातील महानुभाव पंथाच्या सर्व श्रीकृष्ण मंदिरास सभामंडप देणार असल्याचे आ. लोणीकर यांनी यावेळी जाहीर केले. प्रास्ताविकात डॉ. बळीराम बागल यांनी आज समाज - पंथांमधील दुरावा दूर करून एकत्र आणण्यासाठी महाचिंतनी हे उत्तर असून चिंतनीच्या जडण-घडणीसाठी आ.खोतकर यांनी मोलाचे सहकार्य केले, असे सांगून शक्ती- भक्तीच्या योगातून नवनिर्माण घडते. आपण केवळ खारीचा वाटा उचलला यात सर्वांचे सहकार्य लाभले, अशी भावना डॉ. बागल यांनी व्यक्त केली. नागपूर येथील संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. कोमल ठाकरे यांना यंदाचा चिंतनी पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांनी सत्कारास उत्तर दिले. सूत्रसंचालन प्रा. बागल यांनी केले तर प. पू. सुदाम शास्त्री यांनी आभार मानले. यावेळी महिला व भाविकांची प्रचंड संख्येने उपस्थिती होती. शेवटी दहा हजार भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

### पालकांची स्वतंत्र चिंतनी घ्यावी : आ.खोतकर

काजळ्यापासून सुरू झालेला महाचिंतनीचा प्रवास आता व्यापक बनला आहे. राज्यात चिंतनीला एक वेगळे वलय प्राप्त झाले असून शाळकरी , महाविद्यालयीन मुला- मुलींमध्ये आत्म जाणीव, आत्मविश्वास निर्माण व्हावा, त्यांची शैक्षणिक प्रगती व्हावी, वागणे सुधारावे याकरिता पालकांसाठी वेगळी चिंतनी घ्यावी. अशी संकल्पना स्वागताध्यक्ष आ. अर्जुनराव खोतकर यांनी याप्रसंगी मांडली. सलग २८ वर्षे राज्यपाल झाल्यानंतर सुद्धा बागडे यांच्या मनातील भाव आणि चिंतनीशी जोडलेली त्यांची नाळ कायम असल्याचे पाहून सर्वांना ऊर्जा मिळते. असेही आ. खोतकर यांनी नमूद केले.

## थोडक्यात

### रस्त्यासाठी आमरण उपोषण करणार-कावळे

धारूर। प्रतिनिधी

शहरातील नगरपरिषद हद्दीतील गायकवाड गल्ली येथील रस्ते दुरुस्ती करण्याची मागणी मान्य होत नसल्याने दि.२६ जानेवारी रोजी सुनील कावळे सह येथील नागरिक नगरपरिषद कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसणार आहेत तसे निवेदन नगर परिषदेला देण्यात आले आहे. किल्ले धारूर नगरपरिषदे अंतर्गत गायकवाड गल्ली भाग येतो या भागातील अनेक ठिकाणच्या रस्त्याची दयनीय अवस्था झालेली आहे यासंदर्भात नगरपरिषद प्रशासनाला निवेदनाद्वारे कळून रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी केली होती मात्र त्या मागणीची कसलीही दखल नगर परिषद प्रशासनाने घेतली नाही त्यामुळे पुन्हा दि.१४ जानेवारी रोजी निवेदन देऊन रस्ता दुरुस्ती करण्याची मागणी केलेली आहे या मागणीची दखल दि.२५ जानेवारीपर्यंत पूर्ण न केल्यास दि.२६ जानेवारीपासून नगरपरिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा दिलेल्या निवेदनात करण्यात आला आहे या निवेदनावर सुनील कावळे सह नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### द्रोपदाबाई दगडू डोंगरे यांचे निधन

खालापुरी। प्रतिनिधी



शिरूर कासार तालुक्यातील टेंभुर्णी गावचे सरपंच मिथुन डोंगरे यांच्या मातोश्री द्रोपदाबाई दगडू डोंगरे वय वर्ष ७५ यांचे नुकतेच निधन झाले त्यांच्यावर मोठ्या शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. अत्यंत शांत स्वभावाच्या असलेल्या द्रोपदाबाई दगडू डोंगरे यांची टेंभुर्णी परिसरात मोठी छाती होती गोरगरीब व सर्वसामान्यांच्या अडीअडचणीला त्या वेळोवेळी मदत करीत असत शुक्रवारी दिनांक १० रोजी त्यांचे निधन झाले त्यांच्या निधनाने परिसरात मोठी शोककळा पसरली होती त्यांच्यावर मोठ्या शोकाकुल वातावरण आता अंत्यसंस्कार करण्यात आले. आमदार सुरेश आण्णा धस य यांचे निकटवर्ती व अत्यंत विश्वासू असलेले सरपंच मिथुन डोंगरे यांच्या त्या मातोश्री होत्या. त्यांच्या मागे एक मुलगा एक मुलगी सुना नातवंडे असा मोठा परिवार असून दि.१९ रविवार रोजी त्यांचा दशक्रिया विधी टेंभुर्णी येथील डोंगरे वस्ती या ठिकाणी सकाळी साडेनऊच्या सुमारास होणार आहे.

## व्यायामासाठी गेलेल्या डॉक्टरचे चार तोळे सोने लुटले

अंबड। प्रतिनिधी

अंबड शहरातील उपजिल्हा रुग्णालय रोडवरील सारडा क्लिनिक हॉस्पिटलचे डॉक्टर सतीष सारडा हे दि१३ जानेवारी रोजी सकाळी आठ वाजेच्या दरम्यान व्यायाम करण्यासाठी उपजिल्हा रुग्णालय ते बोरी रस्त्यावर गेले असता सदरील रोडवरील तीन अज्ञात अनोळखी विना नंबरच्या मोटरसायकल घेऊन डॉक्टरला आडविले व म्हणाले की तुझ्या गळ्यामधील सोन्याची साखळी व बोटातील अंगठी लवकर काढून दे नसता तुला जीवे मारून टाकू अशी धमकी देऊन चाकूचा व इतर हत्यार चा धाक दाखवून दिल्यामुळे सदरील डॉक्टरांना आपल्या गळ्यातील सोन्याची साखळी व बोटातील सोन्याच्या अंगठ्या चोरट्याला देऊन टाकली नंतर सदरील चोरटे सोन्याचे दागिने घेऊन पसर झाले. या घटने संदर्भात डॉक्टरला विचारले असता ते म्हणाले की मी जर सोनं केले नसते तर मला गंभीर दुखापत केली असती हो तसेच माझ्या जीवाचं काही बरं वाईट झालं असतं असे ते म्हणाले. याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. सदरील घटनेमुळे सकाळी व्यायाम करण्यासाठी जाणाऱ्या महिला पुरुष मध्ये भीतीच वातावरण पसरला आहे या घटनेमुळे आता व्यायाम करण्यासाठी जाणारे महिलेने व पुरुष यांनी अंगावर सोन घालून जाऊ नाही तशी काळजी घेण्यात यावे. सदरील घटना अंबड उपजिल्हा रुग्णालय ते गोदावरी कॉलेज रोड घडली घटना ची माहिती समजतात पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी अंबड इथे भेट दिली व पोलीस प्रशासनाला तपास करण्यासंदर्भात तात्काळ आदेश दिले व तपासकामी एक पोलीस पथक रवाना झाल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी केली

## चित्रकला परीक्षेत जरेवाडी शाळेचे यश

पिंपळवंडी। प्रतिनिधी




सन २०२४ मध्ये महाराष्ट्र शासन कला संचालनायामार्फत घेण्यात आलेल्या इंटरमिजिएट रेखाकला या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परीक्षेत जरेवाडी शाळेचे १३ पैकी १३ सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून १००% टक्के निकाल लागला आहे. या परीक्षेमध्ये आर्या काकडे,इरम सय्यद या दोन विद्यार्थीनी ए-ग्रेड मध्ये उत्तीर्ण झाले आहेत.अर्जुन भागवत, अनुराज पन्हाळकर,नम्रता शिंदे, आरुषी पवार हे विद्यार्थी बी-ग्रेड मध्ये उत्तीर्ण झाले आहेत.तर करण भिलारे, सार्थक शिंदे,संस्कृती जायभाये,साक्षी पवार,रागिनी उंडे,सोनाक्षी शिंदे, सुमित गंडाळ हे विद्यार्थी सी-ग्रेडमध्ये उत्तीर्ण झाले आहेत. या सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शिक्षण विस्तार अधिकारी गोविंद कदम साहेब,मुख्याध्यापक आजिनाथ सुळे सर,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अंगद जरे,उपाध्यक्ष अनिल जरे,पत्रकार बबनराव उकांडे, भाऊसाहेब पवार,चंद्रकांत पवार यांनी अभिनंदन केले आहे.यावेळी उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांचा आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या श्रीमती यादव मॅडम यांचा बक्षीस देऊन सन्मान करण्यात आला.

## आर्ट ऑफ लिव्हिंगच्या १२५ शिबिरार्थींनी आनंद अनुभूतीचा घेतला अनुभव



माजलगाव। प्रतिनिधी

तालुक्यातील एकदरा,तालखेड परिसरातील लोकांच्या शारीरिक, मानसिक आरोग्यासाठी,भावनिक व सामाजिक विकासासाठी आणि आनंदी जिवनासाठी सर्वांच्या सहकार्याने माऊली माध्यमिक विद्यालय एकदरा येथे मोठ्या उत्साहात शिबिर संपन्न झाले.आर्ट ऑफ लिव्हिंग संस्थेचा जगातील १९० देशामध्ये सुरु असलेला (आनंद अनुभूती) शिबीर दि.८ ते १२ जानेवारी या पाच दिवस सकाळी ५:३० ते ८:३० या वेळेत योग, प्राणायाम,ध्यान, आणि सर्वात महत्वाचे सुदर्शन क्रिया शिकवली भास्कर मगर, नंदकुमार शिंदे, श्रीकृष्ण शेजुळ हे तीन योग प्रशिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. समारोपात जिजाऊ जयंती आणि स्वामी विवेकानंद जयंती साजरी केली.शिबीरासाठी गणेश घाटुळ , अच्युतराव चाळक, गणेश सौंदर,राजन सपाटे, महादेव सजगने, परमेश्वर सजगणे, भागवतराव पाटील बाळकृष्ण जोशी, शिवाजी वाळसकर, राम लाखे,पांडुरंग शिंदे,दत्ता पांचाळ यांनी परिश्रम घेतले. दत्तात्रय वाळसकर बप्पा यांनी शाळेची जागा उपलब्ध करुन दिली.एकदरा, तालखेड, पुंगनी ,तेलगाव , डुबा, इरला, खेर्डा व पंचक्रोशीतील पुरुष आणि महिलासह १२५ पेक्षा जास्त लोकांनी शिबीरात सहभाग घेतला. सर्वांचे खूप सुंदर अनुभव व्यक्त केले. प्रत्येक व्यक्तीच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहात होता.व सर्वांनी मिळून लवकरच परत असे शिबिराचे आयोजन करण्याचे निश्चित केले.

## उमेद मार्टचे वर्षा मीना यांचे हस्ते उद्घाटन

जालना। प्रतिनिधी



महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, अंतर्गत ग्रामीण भागातील स्वयंसहाय्यता गटातील महिलांनी उत्पादीत उत्पादनांच्या विक्री करीता हक्काची बाजारपेठ मिळवुन देणे व ग्रामीण महिलांना उद्योजक बनविण्यासाठी "उमेद मार्टची " महत्त्वाची भूमिका असेल असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, वर्षा मीना यांनी केले. शहरातील अंबड रोडवरील खंदारे कॉम्प्लेक्स मध्ये सादरील मार्टचे उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. या वेळी सुनिलकुमार पठारे , प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, श्रीमती कोमल कोरे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण विभाग , प्रेषित मोघे जिल्हा अग्रणी बॅक अधिकारी, मंगेश डांबरे संचालक आरसेटी, शैलेश चौधरी जिल्हा अभियान व्यवस्थापक, उमेद , सुधीर चाटे लेखाधिकारी यांची उपस्थिती होती.

"उमेद मार्ट " मध्ये ग्रामीण भागातील स्वयंसहाय्यता गटातील महिलांनी उत्पादीत उत्कृष्ट गावरान पध्दतीने तयार केलेले मसाले, हळद ,मिरची पावडर, पापड, खारूडी , धपाटे पिठ , ढोकळा पिठ , दाळ बाटी पिठ विविध प्रकारचे फरसाण, गावरान तुप , ॲपल जाम , मध विविध प्रकारच्या डाळी, शोभवंत वस्तु , घोगडी, योगा मॅट पत्रावळी , लाकडी खेळणी असे विवीध प्रकारचे दर्जेदार उत्पादने विक्री करीता उपलब्ध असून "उमेद मार्ट "ला जास्तीत जास्त ग्राहकांनी प्रत्यक्ष भेट देऊन उत्पादनांची खरेदी करून ग्रामीण उद्योजक महिलांना प्रोत्सहन देण्याबाबतचे आवाहनहि मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना यांनी केले आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जालना अंतर्गत स्वयंसहाय्यता गटातील महिलांनी उत्पादीत उत्पादने ऑनलाईन विक्री करीता जालना जिल्हयाची पथदर्शी जिल्हा म्हणुन राज्य अभियान व्यवस्थापन कक्षाने निवड केलेली असुन या अंतर्गत या संकेतस्थळावर एकुण १२१ उत्पादनांची विक्री करण्यात येत आहे. संकेतस्थळास भेट देउन घरपोच सुविधेचा लाभ ग्राहकांनी घ्यावा. सदरील कार्यक्रमासाठी संजय चव्हाण, जिल्हा व्यवस्थापक विपणन, दत्ता सोट जिल्हा व्यवस्थापक उपजीविका , मंजीत कदम यांच्या सह सर्व तालुका अभियान व्यवस्थापक व सर्व ग्रामीण महिला उद्योजक यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून भारतीय संविधानाचा गौरव-भिकुजी इदाते

## दीनदयाळ बँकेच्या युगपुरूष स्वामी विवेकानंद व्याख्यानमालेचा समारोप

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही १० जानेवारी ते १२ जानेवारी २०२४ या कालावधीत तीनही दिवस युगपुरूष स्वामी विवेकानंद यांच्या १६२ व्या जयंतीनिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले होते. या प्रबोधनपर व्याख्यानमालेचा समारोप रविवार, दि.१२ जानेवारी रोजी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भिकुजी दादा इदाते (दापोली) यांच्या 'सामाजिक आचारसंहितेची गाथा - संविधान' या विषयावरील व्याख्यानाने झाला.

कार्यक्रमाची सुरूवात भारतमाता, राजमाता जिजाऊ माँ साहेब, युगपुरूष स्वामी विवेकानंद, पंडित दीनदयाळजी उपाध्याय यांच्या प्रतिमापूजन आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर बँकेच्या वतीने मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर प्रमुख व्याख्याते म्हणून भिकुजी दादा इदाते (दापोली), कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध साहित्यिक प्रभाकरराव साळेगावकर (माजलगाव), सामाजिक कार्यकर्ते विजयराव वाकेकर (परळी वैजनाथ), बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की, उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख, संचालक सर्वश्री रा.गो.धाट, संचालिका शरयूताई हेबाळकर, इंजि.बिपीन क्षीरसागर, मकरंद कुलकर्णी सोनेसांगवीकर, प्रा.अशोकराव लोमटे, प्रा.जयकरण सुरेशकांबळे, बाळासाहेब देशपांडे, तज्ज्ञ संचालक ॲड.अशोक कुलकर्णी व मुख्यकार्यकारी अधिकारी सनतकुमार



बनवसकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. तृतीय पुष्प गुंफताना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भिकुजी दादा इदाते यांनी सांगितले की, स्वामी विवेकानंद यांनी पारतंत्र्यात असलेल्या तत्कालीन समाजात स्फुल्लिंग फुलविले. तर लाल-बाल-पाल यांनी पारतंत्र्यातील भारतात जागृती निर्माण केली. योगी अरविंद, स्वामी दयानंद सरस्वती यांनी देशाच्या एकात्मतेचं चित्र उभे केले. लोकमान्य टिळकांनी शिवजयंती व गणेशोत्सवातून समरसतेचा प्रयोग केला. होमरूल लीगच्या माध्यमातून डॉ.ॲनी बेझंट व लोकमान्य टिळकांनी समविचारी मंडळींशी चर्चा करून सर्वांच्या सामुहिक प्रयत्नांतून १८९५ मध्ये भारतीय संविधानाची १११ कलमं तयार केली. पुढे या सर्व कलमांना 'स्वराज बील' असे संबोधले गेले. या कलमांचा समावेश सध्याच्या भारतीय संविधानात महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केला. महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर, विष्णूशास्त्री चिपळूणकर, दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, राजाराम मोहन रॉय, डॉ.केशव बळीराम हेडगेवार या सर्व महनिय व्यक्तीमत्वांनी त्यांच्या संपूर्ण आयुष्यात भारतीय समाजाच्या उत्थानासाठी विविध सामाजिक आणि विधायक प्रयोग केले. संविधान निर्मिती प्रक्रियेत अतिशय बुद्धिमान, तेजस्वी व्यक्तिमत्त्व असलेल्या १५ महिलांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आला होता. त्यांचे ही महत्वपूर्ण योगदान आहे. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वसमावेशक सर्वसमाज घटकांना न्याय मिळवून देणारे भारतीय संविधान देशाला अर्पण केले. या संविधानात घटनात्मक अधिकार (फंडामेंटल राईट) बहाल करण्यात आले. दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी भारतीय संविधान निर्माते महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे कायमच स्मरण ठेवले. तर विद्यमान पंतप्रधान नरेंद्रजी मोदी हे भारतीय संविधानाला 'धर्म ग्रंथ' मानतात. त्यामुळे संविधान, घटना बदलणार असा विरोधकांचा अपप्रचार आहे. हा फेक नरेटिव्ह आहे. असे कदापि ही होणार नाही. आपण भारताचे जबाबदार नागरिक आहोत. त्यामुळे आपण सर्वांनी भारतीय संविधानाचा लौकिक वाढेल असे साजेसे कार्य करावे, या कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदींकडून भारतीय संविधानाचा वेळोवेळी गौरव करण्यात येत आहे. याचे दाखले देत, सांस्कृतिक, ऐतिहासिक संदर्भ देत दादा इदाते यांनी विषयाची अभ्यासपूर्ण मांडणी केली. सुमारे १५० वर्षांचा कालखंड उभा केला. यावेळी बोलताना सुप्रसिद्ध साहित्यिक प्रभाकरराव साळेगावकर यांनी संविधान हे प्रत्येक भारतीयांच्या जगण्याचा भाग बनले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. अध्यक्षीय भाषणात जाती अंताची लढाई पुन्हा एकदा लढावी लागेल, प्रत्येकाने संविधानाचे पालन करावे, हक्क आणि कर्तव्य एकत्र नांदले पाहिजेत असे ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा म्हणाले. तर समारोपपर मनोगत व्यक्त करताना बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की यांनी सांगितले की, दीनदयाळ बँक एक परिवार म्हणून आम्ही काम करीत आहोत. उत्तम टीमवर्क करून ३१ डिसेंबर २०२४ अखेरपर्यंत ५२२ कोटींच्या ठेवींचा टप्पा पूर्ण केला आहे. एकूण व्यवसायाचा ८५३ कोटींचा पल्ला ही गाठला आहे. लवकरच ३१ मार्च २०२५ अखेरपर्यंत १००० कोटी रूपयांच्या व्यवसायाचे लक्ष्य बँकेने समोर ठेवले आहे. लवकरच ते ही साध्य होईल. आर्थिक क्षेत्रात कार्य करीत असताना सामाजिक बांधिलकी जोपासत समाजाचे आपण काही देणे लागतो. याच जाणिवेने बँकेने मागील २२ वर्षांपासून एक वसा जोपासला आहे. व्याख्यानमालेच्या माध्यमातून वैचारिक स्थिती सुधारावी, खरा इतिहास लोकांसमोर यावा, यासाठी दीनदयाळ नागरी सहकारी बँकेने कोविड काळासह अव्याहतपणे हे कार्य सुरू ठेवले आहे. या उपक्रमाचे हे २३ वे वर्ष आहे. या उपक्रमांतर्गत आजपावेतो सदर व्याख्यानमालेत विविध क्षेत्रातील ६६ मान्यवर व्यक्तींनी रसिकांना वैचारिक मेजवानी देवून वेळोवेळी आपले अनमोल विचार मांडले आहेत. अशी माहिती अध्यक्ष ॲड.पत्की यांनी दिली. सुरूवातीला पाहुण्यांचा परिचय बँकेचे संचालक ॲड.अशोकराव कुलकर्णी व संचालक प्रा.जयकरण सुरेशकांबळे यांनी करून दिला. सुत्रसंचालन संचालक मकरंद कुलकर्णी सोनेसांगवीकर यांनी केले. तर उपस्थितांचे आभार उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख यांनी मानले. आनंदकुमार देशपांडे यांनी वैयत्तिक पद्य सादर केले. वंदे मातरम या राष्ट्रगानास १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल संचालिका सौ.शरयुताई हेबाळकर यांच्या संपुर्ण वंदे मातरम्? च्या गायनाने व्याख्यानमालेचा समारोप झाला. व्याख्यानमालेच्या तीनही दिवस अंबाजोगाईच्या विविध क्षेत्रातील मान्यवर, माता, भगिनी, ज्येष्ठ नागरिक, रसिक श्रोते आणि युवक वर्गाने सहकुटूंब सहपरिवार उपस्थित राहून युगपुरूष स्वामी विवेकानंद व्याख्यानमालेचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या वतीने पुढाकार घेण्यात आला.

# अंबाजोगाई तालुक्यातील ग्रामसेवकांनी कामगारांची अडवणूक थांबवावी- गजानन मुडेगावकर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

तालुक्यातील इमारत बांधकाम कामगार व इतर कामगारांना त्यांच्या नोंदणीसाठी आवश्यक असलेले ९० दिवसांचे प्रमाणपत्र देण्यासाठी ग्रामसेवक टाळाटाळ करत असून या मुळे कामगारांना अनेक योजनांपासुन वंचित राहावे लागत आहे तेव्हा ग्रामसेवकांनी कामगारांची अडवणूक थांबवावी अशी मागणी शिवसेना नेते गजानन मुडेगावकर यांनी केली आहे

महाराष्ट्र शासनाच्या वतीने महाराष्ट्र इमारत बांधकाम कामगार व इतर कामगार मंडळातर्फे कामगारांना त्यांच्या सुरक्षिततेसाठी विविध साहित्य, सुविधा,योजना ,पाल्यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती व विमा अशा विविध योजना राबविण्यात येतात मात्र या योजनेचा लाभ घेण्यासाठी कामगारांनी नोंदणी करणे बंधनकारक आहे ,शहरातील कामगारांना नोंदणी करण्यासाठी नगरपरिषदा मार्फत आवश्यक ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र तर ग्रामीण भागातील कामगारांना नोंदणी साठी ग्रामसेवकांच्या प्रमाणपत्राची आवश्यकता असते मात्र मागील अनेक महिन्यांपासून तालुक्यातील सर्व ग्रामसेवक आम्हाला वरुनच आदेश देण्यात आलेले आहेत की हे प्रमाणपत्र देऊ नये असे सांगत कामगारांची अडवणूक करून त्यांना लाभापासुन वंचित ठेवत आहेत प्रत्यक्षात दिनांक रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी बीड यांनी सर्व गटविकास अधिकाऱ्यांना ४सप्टेंबर २०२४ रोजी एका पत्राद्वारे याबाबत आदेशीत केले आहे या पत्रात असे म्हटले की, महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटना जिल्हा शाखा, बीड यांचे निवेदन दि. २८०/८२०२,महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक यूनियन, डीएनई. १३६ जिल्हा शाखा, बीड यांचे निवेदन दिनांक १८/७/२०२४,इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवा शर्ती) अधिनियम २००७ वरील विषयी संदर्भिय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटना जिल्हा शाखा, बीड यांनी निवेदन देवून कळविलेले आहे की, शासन परिपत्रकानुसार ग्रामिण भागाकरिता ग्रामसेवक यांना बांधकाम कामगारांचा ९० दिवसाचे काम केल्याचे प्रमाणपत्र देण्यासाठी प्रधिकृत माणून नेमले आहेत. परंतू सबंधित ग्रामसेवकांकडून बांधकाम कामगारांची अडवणूक होत असून आम्हाला वरून आदेश आहेत असे सांगून बांधकाम कामगारांची बोळवण केली जात आहे. बांधकाम कामगारांचे हेलपाटे बंद व्हावेत तसेच ग्रामसेवकांना बांधकाम कामगारांना नोदणीसाठी लागणारी सही व शिक्का देण्याबाबत व योग्य ते मार्गदर्शन करून कामगारांचा होणारा अर्थिक व मानसिक त्रास थांबवावा तातडीने लेखीआदेश द्यावेत अन्यथा सदर संघटना जिल्हा परिषद कार्यालयावर उग्र मोर्चा काढून आंदोलन करणार आहे,महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन, डीएनई. १३६ जिल्हा शाखा, बीड यांचे संदर्भिय निवेदनान्वेय कळविलेले आहे की, ९० दिवसाचे काम केलेचा दाखला पडताळणीसाठी कुठल्याही प्रकारचे शासन निर्देश नसल्याने ग्रामसेवकांकडून मजूरांना प्रमाणपत्र देणार नाही म्हणून बहीष्कार टाकलेला आहे. संदर्भ क्र. ३ चे अधिनियमान्वये ग्रामसेवकांनी कामगारांना प्रमाणपत्र देताना सबंधित कामगारांचा वास्तव्याचा अधिकृत पुरावा व अधिकृत फोटो असलेल्या ओळखपत्राचा नमुना अर्जासोबत घेवून बांधकाम कामगारांना नोंदणी प्रमाणपत्र देण्याबाबत सर्व स्थानिक संस्थानी आवश्यक ती कार्यवाही करावी म्हणून शासनाचे सूचना आहेत,



सबब आपणास कळविण्यात येते की, उक्त शासन तरतुदीनुसार कामगारांना ९० दिवसाचे काम केले बाबतचे प्रमाणपत्र देण्या बाबत आपले स्तरावरून ग्रामसेवक / ग्राम विकास अधिकारी यांना योग्य त्या सुचना देवून त्यांना बहिष्कारापासून परावृत्त करावे व याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी व वसे संबंधित संघटना यांना कळवावे. विलंबाची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील याची नोंद घ्यावी असे आदेश तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी दिले आहेत असे असली तरी मात्र अद्यापही गटशिक्षणामध्ये गटविकास अधिकारी यांनी ग्रामसेवकांना कोणतेही आदेश दिले नसल्यामुळे सर्वसामान्य खरे कामगारांची आडवणूक होतआहे तरी तात्काळ कामगारांना नऊ दिवसाचे प्रमाणपत्र देण्यासाठी गटविकास अधिकारी यांनी सर्व ग्रामसेवकांना आदेश द्यावेत अशी मागणी शिवसेना नेते तथासामाजिक कार्यकर्ते गजानन मुडेगावकर यांनी केली आहे ,असे न झाल्यास या संबंधित लवकरच महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे,श्रीकांत शिंदे साहेब यांची भेट घेऊन हा विषय मांडला जाईल तरी तात्काळ आदेशात न केल्यास प्रसंगी आंदोलनाचा इशाराही शिवसेना व कामगारांच्या वतीने देण्यात आला आहे.

# समाजात झालेले दुषित वातावरण दूर करण्यासाठी संतांनी आणि विचारवंतांनी पुढे यावे - अॅड.सर्जेराव तांदळे

बीड । प्रतिनीधी

सध्या समाजामध्ये जे दुषित वातावरण झाले आहे ते दूर करण्यासाठी साधू संत आणि समाजातील विचारवंतानी पुढे यावे असे प्रतिपादन भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा जिल्हा सरचिटणीस अ‍ॅड.सर्जेराव तात्या तांदळे यांनी केले आहे.आदर्श गाव वंजारवाडी येथे राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त होत असलेल्या सप्ताह मध्ये त्यांनी प्रतिपादन केले.पुढे अ‍ॅड.तांदळे म्हणाले की समाजातील सर्व जाती धर्माची माणसे आपण एकमेकांना जीव



लावतो,एकमेकांच्या दुःख सुखामध्ये सोबत असतो, एकमेकांना संकटकाळी मदत करणारे लोक आहोत परंतु सध्याच्या ज्या चुकीच्या पद्धतीने समाजामध्ये दूषित वातावरण पसरले आहे ते येणाऱ्या पिढीसाठी आणि आपल्यासाठी खूप धोकादायक आहे. आपण नेहमीच राष्ट्रीय एकात्मता प्रमाणे सर्वधर्मसमभाव आणि सर्व समाजातील लोकांनी एकत्रित राहणे ही काळाची गरज आहे. काही चुकीच्या प्रवृत्तीमुळे आपण हे दूषित वातावरण समाजामध्ये पसरू देता कामा नये ही आपली नैतिक जबाबदारी आहे. यासाठी सर्व समाजातील संत महंत विचारवंतांनी पुढे येऊन हे कार्य हाती घेतली पाहिजे. आदर्श गाव वंजारवाडी येथे ह.भ.प. विनोदाचार्य प्रकाश महाराज साठे यांचे कीर्तन संपन्न झाले. त्यांनी अतिशय सुरेख असे किर्तन केले. आदर्श गाव वंजारवाडी मध्ये अतिशय आगळावेगळा सप्ताह गेली ६१ वर्ष झाली सुरू आहे. या सप्ताह चे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण सात दिवस गावात चुलबंद असते. संपूर्ण गावकरी सकाळचा नाष्टा आणि दोन वेळेचे जेवण एकत्रितपणे करते. आपल्या या गावच्या सामाजिक सलोख्याचा आणि एकात्मतेचा सूर्य आम्ही सदैव प्रकाशित करीत राहू अशी ग्वाही गावकऱ्यांनी यावेळेस केली.

# श्रीगणेश जयंतीनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील श्री गणपती मंदिर ट्रस्ट, चौभारा यांच्याकडून दरवर्षी प्रमाणेच याही वर्षी श्रीगणेश जयंतीनिमित्त विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यात गणेशयाग पालखी सोहळा काढण्यात येणार असून भाविक भक्तांना महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे.

श्री गणपती मंदिर ट्रस्ट, चौभारा यांच्या वतीने दरवर्षी प्रमाणेच याही वर्षी श्रीगणेश जयंतीनिमित्त १ फेब्रुवारी २०२५ रोजी विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. याच्या नियोजनासाठी रविवार रोजी ट्रस्टचे पदाधिकारी व भाविक भक्त यांच्या बैठकीचे आयोजन



**श्री गणपती मंदिर ट्रस्ट, चौभारा यांच्याकडून गणेशयाग पालखी सोहळा, महाप्रसाद**

करण्यात आले होते. यावेळी झालेल्या व्यापक आणि सकारात्मक चर्चेतून श्रीगणेशयाग पालखी सोहळा साजरा करणे व भाविक भक्तांना महाप्रसाद वाटप करण्यासंदर्भात सर्वानुमते ठरले. ज्यात कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विविध जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले. या बैठकीस शिरीष भावठाणकर, विजयराव उमणवार, शंकरराव भावठाणकर, सतिश राऊत, भागवतराव देवशटवार, नंदकिशोर देशमाने, भिमाशंकर राऊत, प्रभाकर देशमाने, दयानंद दगडू राऊत, माऊली सातभाई, शंभुलिंग राऊत, संगम देवशटवार, दयानंद राऊत, बालाजी कोंडेकर, अमोल राऊत, राम घोडके, अतुल राऊत, सुहास सातभाई, शिवलिंग राऊत, शंकर सातभाई, नागेश्वर राऊत, संकेत झरकर, ओमकार धोत्रे, राहुल भावठाणकर, संदीप भावठाणकर, शुभम भावठाणकर, महेश राऊत, बालाजी राऊत, गोविंद राऊत, विलास जिरे, कृष्णा घोडके, संतोष घोडके, गजानन घोडके, अनंत घोडके, अभिजीत

◀◀ पान ३ वर



**माजलगाव:-** केज येथे बीड लोकसभेचे लोकप्रिय खासदार मा.बजरंग (बप्पा) सोनवणे यांची दि १३ जानेवारी सोमवार रोजी भेट घेऊन माजलगाव एकता पत्रकार संघाच्या वतीने आयोजित दि २७ जानेवारी रोजी होणाऱ्या मुकनायक व माजलगाव भुषण पुरस्कार सोहळ्याचे निमंत्रण देतांना पत्रकार ज्योतीराम पांढरपोटे,पत्रकार वाजेद पठाण, शेकापचे नेते ऑड नारायण गोले पाटील,राजाराम जमजाळ.



# भव्य किर्तन महोत्सव तथा संत सेवकाचा सन्मान सोहळा संपन्न

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

कुलस्वामिनी आई श्री तुळजाभवानी मंदिर मोहखेड रोड देव दहिफळ येथे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाची निरपेक्ष सेवा करणारे महाराज मंडळी यांच्या किर्तन सेवा, संपन्न झाली तसेच परीसरातील गायक वादक यांनी देखील विनामुल्य सेवा केली यात, सुशन महाराज काशीद, उध्दव महाराज कोथिंबीरे, शंकर महाराज ◀◀ पान ३ वर

# नदीप्रमाणे आपले जीवन निर्मळ, पवित्र आणि प्रवाहित बनवावे –शैलेश कंगळे

माजलगाव । प्रतिनिधी

येथील श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयात दि १४ जानेवारी मंगळवार रोजी भूगोल दिन संपन्न झाला.यावेळी व्यासपीठावर मुख्याध्यापक संतोष लिंबकर, उपमुख्याध्यापक शैलेश कंगळे,विभाग प्रमुख रवींद्र खोडवे,पर्यवेक्षक सदाशिव ढगे,शिवहरी गिरी, अमोल ठाकुर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमोल ठाकुर यांनी केले.प्रमुख




पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांना शिवहरी गिरी यांनी मकर संक्रमणा विषयीचे मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय ◀◀ पान ३ वर

# नागनाथ देवस्थान मानूर येथे अखंड शिवनाम सप्ताहाची सांगता

मानूर । प्रतिनिधी

प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवनामध्ये अनेक गोष्टी दान कराव्या लागतात आणि ते दान केल्यानंतर पुण्य प्राप्त होत असते. हेच दान अनेक पटीने करायचे असेल तर त्याव्यक्तीला मठसंस्थान किंवा गुरुस्थानाच्या ठिकाणी दान करावे लागते. त्यावेळी त्याचे पुण्य कैकपटीने फळास प्राप्त होते. असे प्रतिपादन श्री ष ब्र १०८ गुरु विरूपाक्ष शिवाचार्य मानूरकर महाराज यांनी मानूरमधील सप्ताह सांगता प्रसंगी केले. श्रीमद्? वीरसिंहासनाधीश्वर रेणुकशाखीय वीरगोत्रिय श्री नागनाथ देवस्थान जहागीरदार मठसंस्थान मानूरचे



लिंगैक्य श्री ष ब्र १०८ गुरु विरूपाक्ष शिवाचार्य महाराज यांचे १९ वे पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त श्री तीर्थक्षेत्र नागनाथ देवस्थान जहागीरदार मठसंस्थान मानूर येथे अखंड शिवनाम सप्ताह,ग्रंथराज परमरहस्य पारायण व नित्य लघुरुद्राभिषेक सोहळा हा शनिवार दिनांक ४ ते ११ जानेवारी २०२५ या कालावधी संपन्न झाला. या सप्ताहाची सुरुवात लिंगैक्य श्री श्री गुरुगिरी शिवाचार्य मानूरकर महाराज यांनी २००८ या सालापासून सर्व शिष्य व सदभक्तांच्या सहभागातून सुरू केलेला हा सप्ताहास असून गेल्या अनेक वर्षापासून महाराष्ट्र सह बाहेरील राज्यातून बिहार, गुजरात, कर्नाटक यासह अनेक राज्यातून शिष्य व सदभक्त मंडळी आपली उपस्थिती लावतात व आपली सेवा गुरुचरणी समर्पित करतात शिवनाम सप्ताहाच्या सांगताच्या एक दिवस अगोदर भव्य दिव्य पालखी व मिरवणूक संपन्न झाली. त्याचबरोबर या मिरवणुकीमध्ये संयुक्तपणे "गुरुराज माऊली" व "विरूपाक्ष महाराज की ◀◀ पान ३ वर

# अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेचे विविध मान्यवरांना समाजभूषण पुरस्कार प्रदान

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेच्या वतीने देशातील विविध क्षेत्रातील विविध नामवंत मान्यवरांना समाजभूषण पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून देशाचे ऊर्जा राज्यमंत्री नामदार श्रीपाद नाईक , तर कार्यक्रमाच्या अध्यक्ष पदी महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक जायसवाल हे होते. महासभेचे नवनियुक्त अध्यक्ष राजकिशोर



मोदी , माजी मंत्री प्रकाश चौधरी, प्रदीप जयस्वाल, सुरेंद्रपाल अहलुवालिया, राजा चौधरी, आमदार श्रीमती अनुपमा जयस्वाल, अटल गुप्ता, अर्चना जयस्वाल, कुमार गौड , यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या पुरस्काराचे वितरण अखिल भारतीय जायसवाल सर्ववर्गीय महासभेच्या दहाव्या राष्ट्रीय महा अधिवेशना दरम्यान वितरित करण्यात आले.

महासभेच्या वतीने पुरस्कार प्रदान करण्यात आलेल्या देशभरातील मान्यवारांमध्ये प्रामुख्याने आमदार प्रदीप शिवनारायन जायसवाल (छत्रपती संभाजीनगर), माजी आमदार तथा माजी राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश नाथुलालजी चौधरी ,(बडी सादडी जिल्हा चितोडगड , राजस्थान), प्रदीपकुमार धिरजलालजी जायसवाल ◀◀ पान ३ वर

# रोड रॉबरी करणारे तिन आरोपीला मुद्देमालासह पकडले

अंबड । प्रतिनिधी

१३ जानेवारी रोजी हॉटेल मनोज जवळ रामेश्वर नारायण बुलबुले रा. दैठणा खुर्द ता. अंबड जि. जालना ह.मु गेवराई ता. गेवराई जि.बिड यांना शहागड येथील सागर हॉटेल वर जेवण करुन निघुन बस स्टैंड समोरील पेट्रोलपंपवर पेट्रोल भरण्यासाठी जात असतांना तिन आज्ञात आरोपीतांनी त्याच्या फायद्यासाठी फिर्यादीची होन्डा कंपनीची यूनिकॉर्न मॉडलची मोटारसायकल जिचाआर.टि.मो क्र -२१- -५७१३ आडवुन चाकुचा धाक दाखवुन त्यांच्या खिश्यातील दोन मोबाईल व फिर्यादीच्या ताब्यातील मोटारसायकल ही बळजबरीने हिसकावुन नेली म्हणुन पोलीस स्टेशनला गुरन. ०९/२०२५- कलम ३०९ (४), ३ (५) बीएनएस २०२३ प्रमाणे एकून गेला माल ज. वा किं. अं ११००००/- एकूण



किंमतचा गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. सदर तिन्ही आरोपीतांचा घटना घडल्यापासुन पोलीस शोध घेत होते. तांत्रिक माहितीद्वारे सदर चोरटे हे गुन्हा घडल्यानंतर छत्रपती संभाजी नगरच्या दिशेने गेल्याची माहिती प्राप्त झाल्यावर छत्रपती संभाजी नगर शहरच्या पोलीसांचे मदतिने त्यांना शिताफीने तात्काळ ताब्यात घेतले. सदर आरोपी अमेर खा अकबर खा वय २८ वर्षे रा. कानडी रोड, कोकशहा पिरदर्गा रोड केज जिल्हा बीड मोबाईल क्रमांक ९७६४४५६४५५ याचेवर यापुर्वी ।) पेठ पो.स्टे. जि. बीड येथे गुरनं २७६/२०२४ भा.ह.का. क ४-२५ प्रमाणे ) शिवाजीनगर पो.स्टे. जि. बिड येथे गुरनं ६०१/२०१८ प्रमाणे ३९२,३४ प्रमाणे )) शिवाजीनगर पो.स्टे. जि. बिड येथे गुरनं ६२४/२०१८ प्रमाणे ३९२,३४ प्रमाणे गंभिर गुन्हे दाखल आहेत.

आरोपी क्र. ०२ जुबेर मुस्ताक फारुकी वय २८ वर्षे रा. रोजा मोहल्ला ता. केज जि. बीड मोवाईल क्रमांक ९३०६९३७५१०७ याचेवर ।) केज पो.स्टे. जि. बिड येथे गुरनं ५०६/२०२२ कलम ३८५,३७९,३४ भा.दं.वि.प्रमाणे ) केज पो.स्टे. जि. बिड येथे गुरनं ३१८/२०१६ कलम ४५२,३२३,५०४,५०६,३४ भा.दं. वि. प्रमाणे ) केज पो.स्टे. जि. बिड येथे गुरनं २१०/२०२४ कलम ४५२,४२७,३२३, ५०४,५०६,३४ भा.दं. वि.प्रमाणे गंभिर गुन्हे दाखल आहेत. आरोपी क्र. ०३ आवेज खाजा शेख वय २७ वर्षे रा. कानडी रोड कोकशहा पिरदर्गा रोड केज जिल्हा बीड मोबाईल क्रमांक ७८७५८७०११६ याचेवर १) केज पो.स्टे. जि. बिड येथे गुरनं ◀◀ पान ३ वर

# ज्ञानगंगा व शिवालय गुरुकुल हे उज्वल भविष्यासाठी विद्यार्थी घडवण्याचे कार्य करते –प्राचार्य डी.डी.राऊत

**वडवणी । प्रतिनिधी**

दि.१२ जानेवारी २०२५ रोजी प्रतिवर्षा प्रमाणे गोरगरीब,कष्टकरी,ऊसतोड कामगारांच्या मुलां-मुलींसाठी शैक्षणिक कार्य करणारे ज्ञानगंगा व शिवालय गुरुकुल वडवणी येथे सावित्रीबाई फुले,राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या संयुक्त जयंती निमित्त वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाराणी ताराबाई माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य मा. राऊत डी.डी ,प्रमुख पाहुणे श्री मा..डोईफोडे आर.एस, प्रा.बि.डी.मुंडे सर,श्री विष्णु आंधळे सर, व्याख्याते व उत्कृष्ठ



सुत्रसंचालक प्रा.अंडील सर,प्रा.सी.व्ही.मुंडे सर छत्रपती राजश्री शाहू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे श्री दिपक वडमारे सर,मा.महानवर सर, मा.ईतापुरे सर, स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालयाचे मा.बांगर सर मा.गुरसाळी सर तसेच गुरुकुलचे संचालक प्रा.विष्णु डोईफोडे सर संचालिका श्रीमती डोईफोडे मॅडम व पालक वृंद उपस्थित होते. या स्पर्धेमध्ये अनुक्रमे प्रथम,द्वितीय आणि तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना महाराणी ताराबाई विद्यालया मार्फत उपस्थित सर्व मान्यवरां ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# मावळवासियांची मकरसंक्रांत झाली गोड! आमदार सुनील शेळकेंच्या प्रयत्नांमुळे वाचणार शेतकऱ्यांचे ७५ कोटी

वडगाव मावळ : मावळ तालुक्यातील रिंग रोड बाधित शेतकऱ्यांच्या तक्रारी सोडविण्यासाठी प्रांतअधिकारी सुरेंद्र नवले व शेतकऱ्यांच्या उपस्थितीमध्ये तहसील कार्यालय वडगाव मावळ येथे आमदार सुनील शेळके यांच्या माध्यमातून बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



यामध्ये सुमारे ७४ शेतकऱ्यांनी त्यांच्या तक्रारी दाखल केल्या असून त्यापैकी बहुतांशी निकाल तात्काळ देण्यात आले असून उर्वरित शेतकऱ्यांना येत्या ८ दिवसांत निकाल देण्यात येईल.

मावळ तालुक्यातून जात असलेल्या रिंगरोडमुळे अनेक शेतकरी बाधित झाले असून बहुतांश शेतकऱ्यांना रिंगरोडचा मोबदला भेटला असून अनेक गावामध्ये शेतकऱ्यांमध्ये आपआपसात मतभेद असल्याने अद्याप मोबदला मिळाला नाही मोबदला देण्याचा अवधी उलटून गेल्याने अनेक शेतकऱ्यांना पंचवीस टक्के कपात करून मोबदला देण्यात येणार होता ही बाब मावळचे आमदार सुनील शेळके यांच्या लक्षात आल्याने त्यांनी शेतकरी आणि प्रांत अधिकारी यांची बैठक बोलावून शेतकरी यांचा तक्रारी जाणून घेतल्या व शेतकरी यांना आपले नुकसान होऊ नये म्हणून आपापसातील वाद मिटवण्याची सूचना करून प्रांत अधिकारी यांच्याकडून शेतकऱ्यांसाठी आठ दिवसाची मुदतवाढ करून घेतली

ज्या गावांमध्ये सक्तीचे भूसंपादन राबविण्यात आले त्यामध्ये आता काही बदल करता येणार नसून वडगाव, कातवी, आंबी, सुदुंबरे, सुदवडी आणि इंदोरी या गावांमध्ये सक्तीचे भूसंपादन सुरू झालेले नाही. त्यामुळे येथील शेतकऱ्यांनी येत्या ८ दिवसांत आपले नुकसान टाळण्यासाठी कौटुंबिक वाद हा सामंजस्याने मिटविण्याबाबत आवाहन करण्यात आले. ज्या शेतकऱ्यांचे वाद न्यायप्रविष्ठ आहेत, त्या बाबत आज निर्णय घेण्यात आलेला नसून त्यासाठी पुढील ८ दिवसांचा कालावधी वाढवून मिळण्याबाबत प्रशासनास यावेळी विनंती करण्यात आली तसेच वडगाव व नानोली भागातील कातकरी बांधवांची घरे रिंग रोडमध्ये बाधित झाली असून त्यांनाही त्याबदल्यात मोबदला देण्याबाबत सूचना यावेळी करण्यात आल्या. ह्या बैठकीस प्रांताधिकारी श्री. सुरेंद्र नवले साहेब, उप-अभियंता सार्व. बांध श्री. धनराज दराडे साहेब, भूमि अभिलेख उपअधीक्षक सौ. पल्लवी ताई पिंगळे, उप-अभियंता एम.आय.डि.सी. श्री. विठ्ठल राठोड साहेब उपस्थित होते. रिंगरोड बाधित शेतकऱ्यांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी बैठक बोलावण्यात आली होती यामध्ये अनेक शेतकऱ्यांच्या तक्रारीचे निराकरण करण्यात आले शेतकऱ्यांचे कोणताही प्रकारचे आर्थिक नुकसान होऊ नये त्यांच्यावर अन्याय होऊ नये हा यामागील मुख्य उद्देश होता या बैठकीत आठ दिवसाची मुदत वाढ देण्यात आली असून शेतकऱ्यांनी सक्तीची जमीन अधिग्रहण होणार नाही आपले नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी, असे मत आमदार सुनील शेळके यांनी व्यक्त केले आहे.

# पुणे हादरलं! पत्नीवर चाकूने सपासप वार; पतीचाही आत्महत्येचा प्रयत्न

पुणे । प्रतिनिधी

वाद-विवादातून पत्नीवर चाकूने सपासप वार करुन पतीने आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना बाणेर भागात घडली आहे. या घटनेत महिलेसह तिचा पती गंभीर जखमी झाला असून, त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. नसीमा मुल्ला (वय ३२), अमजद युसुफ मुल्ला (वय ३९, रा. चेंबूर, विष्णूनगर, मुंबई) अशी जखमी झालेल्यांची नावे आहेत. याबाबत गणेश कचरु लंके (वय ३६, रा. ग्रॅव्हेंटाइन हॉटेल, ज्युपिटर हॉस्पिटलशेजारी, बाणेर) यांनी चतु:शृंगी (बाणेर) पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.



पोलिसांच्या माहितीनुसार, अमजद मुल्ला टेम्पोचालक आहे. त्याची पत्नी नसीमा हिच्याशी कौटुंबिक कारणावरुन वाद व्हायचे. नसीमाचे नातेवाईक बाणेर भागात राहायला आहेत. नसीमा आणि अमजद नातेवाईकांना भेटायला पुण्यात आले होते. बाणेर भागातील एका हॉटेलमध्ये ते उतरले होते. सोमवारी (१३ जानेवारी) सकाळी दोघांमध्ये हॉटेलच्या खोलीत वाद झाले. नंतर अमजदने पत्नी नसीमावर चाकूने वार केले. अमजदने स्वत:च्या गळ्यावर, तसेच पोटावर चाकूने वार केले. दोघे जण गंभीर जखमी झाले. हॉटेलमधील खोलीत सुरू असलेला आरडाओरडा ऐकून कर्मचाऱ्यांनी तेथे धाव घेतली. जखमी अवस्थेतील मुल्ला दाम्पत्याला खासगी रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक तपासात अमजदने कौटुंबिक वादातून पत्नीवर चाकूने वार केल्याची माहिती मिळाली आहे. वरिष्ठ निरीक्षक महेश बोळकोटगी यांनी घटनास्थळी भेट दिली. सहायक पोलीस निरीक्षक अनिल केकाण अधिक तपास करत आहेत.

# पुण्यातील १७ टेकड्यांबाबत मोठा निर्णय; मंत्री चंद्रकांत पाटील यांचे वनविभागाला आदेश

पुणे । प्रतिनिधी

येथे वन विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पुणे शहरात येणाऱ्या टेकड्यांबाबत वनविभागाला काही आदेश दिले आहेत. पुणे शहरात एकूण १७ टेकड्या आहेत. या सर्व टेकड्या वन विभागाच्या अंतर्गत येतात. त्या टेकड्यांचे क्षेत्रफळ किती? टेकड्यांवर झाडे किती? या सर्वांची माहिती घेण्याचे आदेश चंद्रकांत पाटील वनविभागाला दिले आहेत. येथील म्हातोबा टेकडीवर आगीच्या तीन घटना घडल्या होत्या. या आगीच्या घटनेत तब्बल अडीच हजार झाडांचे नुकसान झाले. यामुळे टेकड्यांवर सीसीटीव्ही लावणे, सुरक्षा गार्ड नेमणे, वॉच टॉवर उभे करणे, गवत साचू न देणे, मशीनच्या साह्याने गवत काढणे आणि त्याची विल्हेवाट लावणे याबाबत आयोजित केलेल्या बैठकीत चर्चा करण्यात आली. तसेच त्यानुसार उपाययोजना करण्याच ठरले.



पुण्यातील एका टेकडीमुळे सर्व टेकड्यांचा प्रश्न समोर आला आहे. टेकड्यांवरील वणवे, सायंकाळनंतर फिरणारी जोडपी, अतिक्रमण आदी गोष्टींवर कडक लक्ष ठेवण्यात येईल. तसेच सायंकाळनंतर टेकडीवर गस्त घालण्यासाठी मनुष्यबळाची सोय केली जाईल, अतिक्रमण करणाऱ्यांवर कारवाई करण्याचा इशारा पाटील यांना यावेळी बोलताना दिला. तसेच म्हातोबा टेकडीवर पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त साडेसहा हजार झाडे लावली होती. परंतु, गेल्या काही दिवसांमध्ये तिथे आग लागली आणि लावण्यात आलेली अडीच हजार झाडे आगीत जळाली. आता या पुढे वनविभागाला यावर बारकाईने लक्ष ठेवण्याच्या सूचना पाटील यांनी दिल्या आहेत.

# कृषी पणन मंडळाच्या मिलेट (तृणधान्य) महोत्सवाला पुणेकरांचा उत्तम प्रतिसाद

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत ८ ते १२ जानेवारी, २०२५ या कालावधीत श्री गणेश कला क्रीडा रंगमंच, स्वारगेट येथे आयोजित करण्यात आलेल्या दुसऱ्या 'मिलेट महोत्सव-२०२५' महोत्सवाला पुणेकरांनी उत्तम प्रतिसाद दिला. महोत्सवाद्वारे सुमारे ३५ लाखांची उलाढाल झाली असून यापुढील काळातही विविध महोत्सव आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.

संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०२३ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष' म्हणून साजरे केले. या निमित्ताने देशभर विविध उपक्रम राबविण्यात आले. यामुळे मोठ्याप्रमाणात नवऊद्योजक तयार झाले. त्यामुळे त्यांना विक्रीसाठी व्यासपीठ देण्यासाठी कृषी पणन मंडळामार्फत या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. महोत्स्वाचे उद्घाटन पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते झाले. यावेळी पणन मंडळाच्या अधिकारी कर्मचारी यांच्या मिलेट बाईक रॅलीद्वारे पुणे शहरातील प्रमुख मार्गावरून मिलेटबाबतची जन-जागृती करण्यात आली.


महोत्सवामध्ये राज्याच्या विविध भागातून तृणधान्य उत्पादक, प्रक्रियामध्ये कार्यरत असणारे बचत गट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, नवउद्यमी (स्टार्टअप) कंपन्यांना ५० दालने (स्टॉल) उपलब्ध करून देण्यात आले होते. ग्राहकांना अस्सल मालदांडी - दगडी ज्वारी, बाजरी, नाचणी, भगर, राळा, सामा, कोद्रा ही तृणधान्ये व त्यापासून तयार करण्यात येणारा ज्वारीचा रवा, बाजरीच्या लाह्या, रागीची बिस्किटे, ज्वारीचे इडली - मिक्स, रागीचा डोसा मिक्स, वरईचे दूध, वरईचे श्रीखंड, बाजरीची बर्फी अशी विविध नाविण्यपूर्ण उत्पादनांसोबतच नागपूरची संत्री व त्याचा रस थेट उत्पादकांकडून प्रदर्शन तसेच विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आला. ज्वारी, बाजरी आणि नाचणीपासून बनविलेल्या २० प्रकारच्या चवींची आईस्क्रीम हे या महोत्सवाचे आकर्षण ठरले.

महोत्सवामध्ये मिलेट उत्पादन, मूल्यवर्धीत प्रक्रिया उत्पादने, आरोग्यविषयक महत्व या विषयी महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत अखिल भारतीय समन्वयीत नाचणी व तत्सम तृणधान्य संशोधन प्रकल्प, विभागीय कृषी संशोधन केंद्र, कोल्हापूरचे प्रमुख, डॉ. योगेश बन यांचे मार्गदर्शन ठेवण्यात आले होते. त्यास ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. या महोत्सवात पणन मंडळाचे कार्यकारी संचालक श्री. कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी महोत्सवातील मिलेट उत्पादकांशी मिलेटच्या विक्रीव्यवस्थेबाबतच्या (मार्केटिंग) अडचणींविषयी चर्चा केली. महोत्सव यशस्वी करण्यासाठी श्री. कदम तसेच श्री. कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली देशांतर्गत व्यापार विकास विभागाचे मंगेश कदम, सहाय्यक सरव्यवस्थापक सुहास काळे, सचिन माने, उमाकांत वाघ, साक्षी गायकवाड व आनंद शुक्ल यांनी परीश्रम घेतले. महोत्सवास विविध क्षेत्रातील साधारणत: १२ ते १५ हजार व्यक्तींनी समक्ष भेट देऊन तृणधान्याची उत्पादने खरेदी केली, अशीही माहिती कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक श्री. संजय कदम यांनी दिली.

# अखेर दहा वर्षांच्या सेवेनंतर पुण्याचा 'संकटमोचक' निवृत्त; महत्वाच्या मिशनमध्ये 'तेजा'ने बजावली उत्कृष्ट कामगिरी

पुणे । प्रतिनिधी

पुणे: शहर पोलीस दलातील महत्वाची कामगिरी अन् जबाबदारी पार पाडणारा 'तेजा' अखंड सेवेनंतर निवृत्त झाला. तेजाने राष्ट्रपती, पंतप्रधान आणि अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या बंदोबस्तात आपली चोख कामगिरी पार पाडली. त्याच्या निवृत्तीवेळी त्याच्या हँडलेर अन् इतरांना अश्रू अनावर झाले होते. अत्यंत भावपूर्ण वातावरणात त्याला निरोप देण्यात आला आहे. त्याने दहा वर्ष शहर पोलीस दलाच्या माध्यमातून पुणेकरांची सेवा केली. तेजाच्या निवृत्तीचा सोहळा शिवाजीनगर येथील बॉम्बशोधक-नाशक पथकाच्या कार्यालयात नुकताच पार पडला.



पोलीस दलात श्वान महत्वाची भूमिका बजावतात. बंदोबस्त, गुन्ह्यांचा तपासात त्यांचे महत्व विशेष असते. पुणे बॉम्ब शोधक-नाशक पथकात तेजा गेल्या दहा वर्षापासून कर्तव्य बजावत होता. अतिमहत्त्वाच्या व्यक्तींचा बंदोबस्त, संशयित वस्तू, स्फोटकांची तपासणी, शहरातील महत्त्वाच्या ठिकाणांची नियमित तपासणी तसेच गंभीर गुन्ह्यांच्या तपासात तेजा सहभागी होता. राष्ट्रपती, पंतप्रधानांसह अतिमहत्त्वाच्या राजकीय नेत्यांचा बंदोबस्त, पालखी, गणेशोत्सव बंदोबस्तात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली. जी-२० परिषद व शहरात आयोजित करण्यात येणाऱ्या महत्त्वाच्या कार्यक्रमात त्याने योगदान दिले. तेजाचा जन्म दि. ११ जानेवारी २०१५ रोजी तेजाचा जन्म झाला. नंतर महिनाभरात पुणे पोलिसांच्या बॉम्बशोधक-नाशक पथकात तो सहभागी झाला. शिवाजीनगर येथील राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या (सीआयडी) श्वान प्रशिक्षण केंद्रात तेजाचे प्रशिक्षण पुर्ण झाले. सहा महिन्यांच्या खडतर प्रशिक्षणानंतर लॅब्रोडोर जातीचा तेजा बॉम्बशोधक-नाशक पथकाच्या सेवेत रुजू झाला, अशी माहिती बॉम्बशोधक-नाशक पथकातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक पी. जी. येळे यांनी दिली. प्रशिक्षण कालावधीपासून उपनिरीक्षक सलीम शेख, हॅण्डलर सहायक फौजदार अविनाश श्रीमंत, हवालदार किसन ढेंगळे यांनी तेजाचा सांभाळ केला.


### गावठी बॉम्ब शोधून दुर्घटना टाळली

तेजाच्या निवृत्तीनंतर पथकाची धुरा विराट, राणा, ध्रुवा, राकी, आझाद, वीर, शौर्य या श्वानांवर आहे. वीर आणि शौर्य यांचा पथकात नव्याने समावेश करण्यात आला असून, त्यांना श्वान प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आले आहे. काही वर्षांपूर्वी भोसरीतील दिघी रस्त्यावर एका घरासमोर रानडुकराच्या शिकारीसाठी वापरले जाणारे गावठी बॉम्ब फेकून दिले होते. एका बालिकेने खेळता-खेळता चेंडू समजून एक हातबॉम्ब हातात घेतला व स्फोटात तिचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच बीडीडीएसचे पथक घटनास्थळी रवाना झाले. त्या वेळी झुडपांत टाकून दिलेले गावठी बॉम्ब तेजाने शोधून काढले होते, अशी आठवण बॉम्बशोधक-नाशक पथकातील हॅण्डलर अविनाश श्रीमंत यांनी सांगितली.

# बारामतीत कचरागाडीने माजी उपनगराध्यक्षांना दिली धडक; मद्यधुंद चालकाचा प्रताप

**बारामती । प्रतिनिधी**

बारामती नगरपालिकेच्या माजी उपनगराध्यक्षा ज्योती नवनाथ बल्लाळ यांच्यासह इतर दोन महिलांना बारामती नगरपालिकेच्या मद्यधुंद चालकाने कचरा संकलन करणाऱ्या गाडीने ठोकल्याची घटना बारामतीत घडली आहे. या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात फिर्यादी सुनीता लोंढे यांनी फिर्याद दिली आहे. याबाबतची माहिती अशी की, बारामतीच्या माजी उपनगराध्यक्षा ज्योती नवनाथ बल्लाळ या बारामती शहारातील गणेश भाजी मार्केटमध्ये संक्रांतीची खरेदी करीत असताना नगरपालिकेच्या ठेक्यावर असलेल्या एनडीके नामक कंपनीच्या कचरा संकलन करणाऱ्या गाडीच्या चालकाने मागे खरेदी करीत उभ्या असलेल्या माजी उपनगराध्यक्षा आणि त्यांच्या इतर दोन महिला सहकारी यांना कचरा संकलन करणारी गाडी रिव्हर्स घेऊन ठोकरले.



त्यामुळे तीनही महिला गंभीर स्वरूपाच्या दुखापती झाल्या आहेत. तर मद्यधुंद अवस्थेत गाडी का चालवतो, असा जाब विचारला असता चालकाने उलट उत्तर देऊन चक्क माजी उपनगराध्यक्षांनाच अरेरावी केल्याचा प्रकार बारामतीत घडला आहे. या प्रकरणी आरोपी योगेश चव्हाण, शेखर पवार, विनायक शिंदे यांच्यावर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. संबंधित चालकांसह ठेकेदारावर देखील गुन्हा दाखल करावा अशी मागणी माजी उपनगराध्यक्ष नवनाथ बल्लाळ यांनी केली आहे.

# नायलॉन मांजाने दुचाकीस्वार जेष्ठाचा गाल चिरला

पुणे - दुचाकीस्वार जेष्ठ नागरिकाला मांजा कापल्याची घटना मंगळवारी संध्याकाळी पाच वाजण्याच्या सुमारास शिवाजी पुलावर घडली आहे. यामुळे त्यांच्या गालाला आणि अंगठ्याला गंभीर दुखापत झाली आहे. प्राथमिक उपचार केल्यानंतर त्यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. देवराम दत्तात्रय कामठे ( ६७ रा. पुरंदर, सध्या शिवाजीनगर ) असे जखमी झालेल्याचे नाव आहे.



नायलॉन मांजामुळे दुचाकीवरून जाणाऱ्या एका २६ वर्षीय तरुणाचा गळा चिरून करुण अंत झाल्याची घटना नाशिकमध्ये घडली आहे. यासोबतच छत्रपती संभाजीनगरच्या सातारा परिसरात दुचाकीवरून ड्युटीवर निघालेल्या एका पोलिस उपनिरीक्षकाचा नायलॉन मांजाने गळा चिरल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेत गळ्यातून मोठा रक्तस्त्राव झाल्यामुळे त्यांना येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

दरम्यान, दुचाकीवरून जात असलेली महिला नायलॉन मांजामुळे गंभीर जखमी झाली. नाशिकमधील कन्नमवार पूल परिसरातील ट्रॅक्टर हाउसजवळ सोमवारी (ता. ६) ही घटना घडली. पतीच्या वेळेत लक्षात आल्याने हानी टळली. दरम्यान, वापरकर्त्यांच्या मागणीमुळे चोरीछुपे नायलॉन मांजा विक्री होत आहे. अशा वापरकर्त्यांवर कारवाई कधी होणार, असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

# लग्नाचे आमिष दाखवून महिलांना लुटले; २५ हून अधिक जणींना प्रेमाच्या जाळ्यात फसवले

पुणे । प्रतिनिधी

सध्या सायबर क्राईमचे गुन्हे वाढताना दिसत आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी वर्षभरातील सायबर क्राईमच्या माध्यमातून आर्थिक फसवणूक केल्याची आकडेवारी पुणे पोलिसांनी जाहीर केली होती. तसेच या आकडेवारी सोबतच आर्थिक फसवणूक झालेल्या काही व्यक्तींना रक्कम परत मिळाल्याचेही नमूद करण्यात आले होते. अशा प्रकारचे आर्थिक फसणूक ऑनलाईन डेटिंग वेबसाईट, लग्न जमावण्याचे अनेक साईट्सवरून केली जाते. महिलांना लक्ष करून त्यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक केली जाते. अशा प्रकारच्या एका फेक साईटवरून एकाने तब्बल २५ हून अधिक महिलांना आर्थिक गंडा घातल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यातील लखोबा लोखंडे असे लग्नाचे आमिष दाखवून महिलांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या आरोपीचे नाव आहे. या आरोपीला कोल्हापूर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. फिरोज शेख या नावाने तो महिलांशी संपर्क साधत होता. आरोपी हा लग्न जमवण्याच्या वेबसाईटवरून महिला आणि मुलींशी संपर्क साधत होता. कोल्हापूरातील फसवणूक झालेल्या एका महिलेच्या तक्रारीनंतर कोल्हापूर स्थाानिक गुन्हे अन्वेषण विभागाने त्याच्यावर कारवाई केली आहे. त्याला पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर पोलीसी खाक्या दाखवताच आरोपीने २५ हून अधिक महिलांची लग्नाच्या आमिषाने फसवणूक केल्याची माहिती पोलिसांनी दिली.कोल्हापूर येथील एका घटस्फोटित महिलेशी फिरोजने एका लग्न जमावण्याच्या साईटवरून संपर्क केला. आपण इंडस्ट्रीयल कॉन्ट्रॅक्टर आहोत, अशी थाप त्याने या पीडितेला मारली. तिचा आणि तिच्या कुटुंबाचा विश्वास संपादन केला. तरुणीशी शारीरीक संबंध देखील ठेवले. तिच्याकडून १ लाख ६९ हजार रुपये उकळले. तर ८ लाख २५ हजारांचे दागिने देखील घेतल्याचे पीडितेने दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. लग्नाचा विषय निघताच त्याने ब्रेन ट्यूमर झाल्याचा दावा केला. यानंतर पीडित तरुणीला आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तिने कोल्हापूर राजवाडा पोलीस ठाणे गाठत तक्रार दाखल केली. त्याच्याविरोधात आणखी काही गुन्हे दाखल असल्याची माहिती मिळत आहे.

# पुणे तिथे काय उणे! प्रचंड वाहतूक कोंडीत जगात तिसऱ्या क्रमांकावर; 'या' संस्थेने दिला अहवाल

पुणे: पुण्यातील वाहतूक कोंडी अद्याप कमी झालेली नाही. त्यासाठी एकेरी वाहतूक केली गेली आहे. तसेच मेट्रो देखील पुण्यात सुरू करण्यात आली आहे. असे, असतांना देखील प्रचंड वाहतूक कोंडीचे शहर म्हणून पुणे देशातच नाही तर जगात तिसऱ्या क्रमांकावर आले आहे. टॉम टॉम ट्रॅफिक रिसर्च या संस्थेने हा अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालात कोलकता हे देशातील पाहिले, बेंगळुरू हे दुसरे आणि पुणे हे सर्वाधिक वाहतूक असलेले तिसऱ्या क्रमांकाचे शहर बनले आहे. २०२३ मध्ये पुणे यात सातव्या क्रमांकावर होते.

भारतातील सर्वात मोठ्या गर्दीचे आणि वाहतुकी कोंडी होणाऱ्या शहरात जगात पुणे चौथ्या तर भारतात तिसऱ्या क्रमांकावर आहे. यात दुसऱ्या स्थानावर बंगलोर तर पहिल्या क्रमांकावर कोलकता शहराचा समावेश आहे. २०२३मध्ये देखील पुणे सर्वाधिक वाहनांचे शहर होते. त्यानंतर आता २०२४ च्या टॉमटॉमरिसर्चचा अवाहलात पुणे वाहतूक कोंडीच्या बाबतीत तिसऱ्या क्रमांकाचे शहर बनले आहे. पुण्यात १० किमी अंतर कपण्यासाठी तब्बल ३३ मिनिटांचा वेळ लागतो. डच लोकेशन टेक्नॉलॉजी स्पेशालिस्ट टॉमटॉम यांनी जारी केलेल्या ट्रॅफिक इंडेक्स रिपोर्टनुसार, कोलकातामध्ये १० किलोमीटर अंतर कापण्यासाठी सरासरी ३४ मिनिटे आणि ३३ सेकंद लागतात. तर बेंगळुरूमध्ये ३४ मिनिटे आणि १० सेकंद लागतात. पूर्वीच्या अहवालात बेंगळुरू हे भारतातील सर्वात जास्त वाहतूक कोंडीचे शहर मानले जात होते, परंतु २०२४ मध्ये कोलकाता यादीत पुढे आले आहे. २०२४ मध्ये, कोलकातामध्ये वाहनांचा सरासरी वेग फक्त १७.४ किलोमीटर प्रति तास होता. जो भारतातील सर्वात कमी वेग होता. बेंगळुरूमध्ये हा वेग ताशी १७.६ किमी होता. तर, पुण्यात १० किलोमीटर अंतर कापण्यासाठी ३३ मिनिटे आणि २२ सेकंद लागतात.

सर्वात संथ गतीचे शहर...

जागतिक स्तरावरही कोलकाता दुसऱ्या क्रमांकावर आहे. तर बेंगळुरू आणि पुणे अनुक्रमे तिसऱ्या आणि चौथ्या क्रमांकावर आहेत. कोलंबियातील बॅरनक्विला शहराला जगातील सर्वात संथ गतीचे शहर घोषित करण्यात आले, जिथे वाहने सरासरी १०.३ मैल प्रति तास वेग एवढा आहे.